POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१६० ● मुंबई, रविवार, ११ जानेवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA







## एका ईव्हीएमवर नाही, तर ४ ईव्हीएमवर मतदान!

### पूर्ण मतदान कसं करायचं?

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

यंदाची महानगरपालिका निवडणूक तुमच्या–आमच्यासाठी खूप वेगळी असणार आहे. कारण मतदानाची पद्धत बदलली आहे आणि नियमही बदलले आहेत! आता तुम्हाला चार ईव्हीएम वर मतदान करावं लागणार आहे. मुंबई वगळता २८ महापालिकांमध्ये निवडणूक बहुसदस्य पद्धतीने होणार आहे. म्हणजेच काय तर एका प्रभागातून एक नाही तर ४ नगरसेवक निवडले जाणार आहे. म्हणजे काय तर प्रत्येक मतदाराला एका चार मतं द्यावी लागणार आहे. मुंबई वगळता राज्यातील २८ महापालिकांमध्ये आता 'बहुसदस्य पद्धत' लागू झाली आहे. याचा अर्थ असा की, तुमच्या एका प्रभागातून आता एक नाही, तर तब्बल ४ नगरसेवक निवडले जाणार आहेत. या सर्व मशिनवर तुम्हाला एक एक बटन दाबायचे आहे. तुम्ही यामध्ये वेगवेगळ्या पक्षाच्या उमेदवारांना देखील मतदान करू शकता... किंवा नोटा बटन देखील दाबू शकता. पण चार पैकी जर तुम्ही एकाही मशिनवर मतदान केलं नाही, तर तुमचं मतदान अपूर्ण राहणार आहे. एक तांत्रिक गोष्ट लक्षात घ्या की, पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या मशिनवर मतदान केल्यावर फक्त लाल दिवा लागेल. कोणताही आवाज येणार नाही. जेव्हा तुम्ही चौथ्या आणि शेवटच्या मशिनवर बटण दाबाल, तेव्हाच 'बीप' असा आवाज येईल. तो आवाज आला की समजायचं तुमचं मतदान पूर्ण झालं!

**४ सदस्यीय प्रभाग पद्धतीमध्ये मतदान प्रक्रिया कशी असेल ते जाणून घेऊया...**

- मतदान केंद्रावर कमीत कमी २ आणि जास्तीत जास्त ४ ईव्हीएम म्हणजेच इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन असतील.
- तुम्हाला मतदान एकूण ४ म्हणजेच (अ) जागा, (ब) जागा, (क) जागा आणि (ड) जागेसाठी करणे आवश्यक आहे.
- उमेदवारांच्या संख्येनुसार याच चारही जागांची आखणी ईव्हीएमवर होईल. कदाचित या चारही जागा दोन एश्ट वर आखल्या जाऊ शकतात.
- चारही जागेसाठी मतपत्रिकांचे रंग वेगवेगळे दिलेले असतील. 'अ' जागेसाठी पांढरा रंग, 'ब' जागेसाठी गुलाबी रंग, 'क' जागेसाठी पिवळा रंग आणि 'ड' जागेसाठी निळा रंग असेल.
- प्रत्येक मशीनवर उमेदवाराचे नाव व त्याचे निवडणूक चिन्ह असेल. 'अ' जागेत खालील योग्य उमेदवारासमोरील बटण दाबा, लाल लाइट लागेल. याचा अर्थ अ जागेसाठी मतदान प्रक्रिया पूर्ण झाली.
- 'ब', 'क' आणि 'ड' या उर्वरित तिन्ही जागांसाठी हीच पद्धत वापरा.
- एखाद्या निवडणूक जागेसाठी उमेदवार योग्य आणि सक्षम वाटत नसेल तर मशीनवरील NOTA – None of the Above किंवा वरीलपैकी कोणीही नाही असा होतो, ते बटण तुम्ही दाबू शकता.
- तुमचं एक मत देशाचं भविष्य बदलू शकतं. त्यामुळे विचार करून योग्य उमेदवा निवडण्याचा प्रयत्न करा.
- ड जागेसाठी मतदान केल्यानंतर बझर वाजेल. याचा अर्थ तुमची चारही जागांसाठीची मतदान प्रक्रिया पूर्ण झाली.




## यशवंत बँक अपहारप्रकरणी २७ जणांना ईडीच्या नोटीस

### ११२ कोटींच्या चौकशीचा फास आवळला

**कराड :** कराड येथील द यशवंत सहकारी बँकमधील तब्बल ११२ कोटी रुपयांच्या अपहार प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) संशयितांभोवती चौकशीचा फास अधिक घट्ट करण्यास सुरुवात केली आहे. कराड व फलटण येथे छापे टाकल्यानंतर आता या प्रकरणात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग असल्याच्या संशयावरून २७ जणांना इडीने नोटिसा बजावल्या आहेत. या नोटिसांमध्ये राज्य सहकार परिषदेचे माजी अध्यक्ष शेखर चरेगावकर, त्यांचे कुटुंबीय तसेच बँकेचे संचालक मंडळातील सदस्य यांचा समावेश असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. चरेगावकर हे भाजपचे तत्कालीन प्रभावशाली नेते म्हणून ओळखले जात होते, तसेच राज्य मंत्रिमंडळातील एका बड्या मंत्र्यांच्या कृपाशीवार्दाने त्यांनी पदे भूषवली असल्याचा आरोपही या प्रकरणात करण्यात आला आहे. या तपासाच्या अनुषंगाने काही दिवसांपूर्वी ईडीने कराड, फलटणसह जिल्ह्यातील विविध ठिकाणी छापे टाकले होते. या छापेमारीदरम्यान मोठ्या प्रमाणावर महत्त्वाची कागदपत्रे जप्त करण्यात आली असून, दोघांना ताब्यात घेऊन चौकशी देखील करण्यात आली आहे. या सर्व बाबींच्या आधारे इडीने २७ जणांना नोटिसा बजावल्या असून, पुढील टप्प्यात कोणावर अटकेची किंवा मालमत्ता जप्तीची कारवाई होणार का, याकडे कराड, फलटणसह संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे.

**५० जणांविरोधात गुन्हा दाखल**

कराड शहर पोलीस ठाण्यात १२ ऑक्टोबर रोजी द यशवंत सहकारी बँकेच्या आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी शेखर चरेगावकर यांच्यासह ५० जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सध्या जिल्हा पोलीस दलाच्या आर्थिक गुन्हे शाखा (एडह) व ईडी यांच्या संयुक्त पथकाकडून सुरू आहे.







## बीएमसी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांची कडक कारवाई... ६८० परवानाधारक शस्त्रे जप्त

**शस्त्रे जमा करण्याची प्रक्रिया नेमकी कशी**

शस्त्रे जमा करण्याची ही संपूर्ण प्रक्रिया ठरावीक नियम आणि तपासणी यंत्रणेनुसार राबवली जात आहे. प्रत्येक झोनमध्ये विभागीय पोलिस उपायुक्तांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती कार्यरत असून, परवानाधारक शस्त्रधारकांची सविस्तर माहिती तपासली जाते. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले, किंवा निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्थेला धोका निर्माण करू शकणारे परवानाधारक या प्रक्रियेत विशेष लक्षात घेतले जातात. मात्र, खेळाडू किंवा सुरक्षा क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यक्तींना त्यांच्या कामाच्या स्वरूपामुळे काही अंशी सूट देण्यात आली आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

आगामी बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीपूर्वी मुंबई पोलिसांनी शहरातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत. निवडणूक काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांनी परवानाधारक शस्त्रधारकांकडून शस्त्रे जमा करण्याची मोहीम सुरू केली असून आतापर्यंत शहरातील विविध पोलिस ठाण्यांत सुमारे 680 शस्त्रे जमा करण्यात आली आहेत. निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ही शस्त्रे संबंधित परवानाधारकांना परत केली जाणार आहेत.

मुंबई पोलिसांकडून ही कारवाई निवडणूक शांततेत पार पडावी, हिंसाचार टाळावा आणि नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने केली जात आहे. पोलिसांनी दिलेल्या सूचनेनुसार, निवडणुकीच्या कालावधीत ओळखल्या गेलेल्या परवानाधारक शस्त्रधारकांना त्यांची शस्त्रे स्थानिक पोलिस ठाण्यात जमा करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या सूचनांकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर थेट कायदेशीर कारवाई केली जात असून, अशाच एका प्रकरणात शस्त्र न जमा केल्याने एका व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

झोनल स्तरावर तयार झालेली यादी अंतिम मंजुरीसाठी पोलिस आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील वरिष्ठ समितीकडे पाठवली जाते. मंजुरीनंतर, आदर्श आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच संबंधित व्यक्तींना शस्त्रे जमा करण्याचे आदेश दिले जातात. ही शस्त्रे पोलिसांच्या सुरक्षित कोठडीत ठेवली जात असून निवडणुका संपल्यानंतर आणि आचारसंहिता उठवल्यानंतर ती परत केली जाणार आहेत.

दरम्यान, परवानाधारक शस्त्रांबरोबरच बेकायदेशीर शस्त्रांवरही पोलिसांचा दरारा वाढला आहे. निवडणुकीची घोषणा झाल्यापासून शहरात दररोज सरासरी दोन ते तीन बेकायदेशीर शस्त्रांच्या प्रकरणांची नोंद होत असून, अशा प्रकरणांत शस्त्रास्त्र कायद्यानुसार गुन्हे दाखल करून आरोपींना अटक केली जात आहे. असामाजिक घटकांवर कडक नजर ठेवत विशेष मोहीम राबवण्यात येत आहेत.

## पालघरमध्ये पोलिसांनी गुन्हेगारीचे कंबरडे मोडले

■पालघर। प्रतिनिधी,

गेल्या दोन वर्षांत पालघर जिल्ह्यामध्ये गुन्हेगारीच्या घटनांनी डोके वर काढले असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे. सन २०२४ आणि २०२५ या कालावधीत जिल्ह्यात ७८६ गंभीर गुन्हे दाखल झाले असून, खुनासारख्या घटनांनी जिल्हा हादरला आहे. मात्र, या वाढत्या गुन्हेगारीला रोखण्यासाठी पालघर पोलिसांनी कंबर कसली असून कोट्यवधींचा मुद्देमाल जप्त करत गुन्हेगारांना सळो की पळो करून सोडले आहे. २०२४ मध्ये ३५ खून झाले होते, तर २०२५ मध्ये ही संख्या ३१ वर राहिली. दोन वर्षांत एकूण ४४ खुनाचे प्रयत्न झाले आहेत. जिल्ह्यात घरफोडीचे १८६ आणि वाहन चोरीचे १७८ गुन्हे नोंदवले गेले आहेत. याशिवाय ७ दरोडे आणि ३८ जबरी चोरीच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. गुन्हेगारी वाढत असली तरी पालघर पोलिसांनी अवैध धंदे आणि अमली पदार्थांविरुद्ध युद्धपातळीवर मोहीम उघडली आहे. दोन वर्षांत पोलिसांनी एकूण १०३३ कारवाया करून १३८४ आरोपींना गजाआड केले आहे. या मोहिमेत एकूण २४ कोटी ५७ हजार २३४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याशिवाय ई. सी. कायद्यानुसार ३० गुन्हे दाखल करून ४० व्यक्तींवर कारवाई करण्यात आली असून, १ कोटी ५० लाख ८३ हजार २९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एकूण पाहता दोन वर्षांत १०३३ कारवाया, १३८४ अटका करण्यात आल्या असून, २४ कोटी ५७ हजार २३४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्हेगारीचा वाढता आलेख चिंतेचा विषय ठरत असला, तरी पोलिसांच्या कठोर कारवायांमुळे अवैध धंदे आणि गुन्हेगारांवर मोठा दबाव निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

हजारांहून अधिक कारवाया यशस्वी कारवायांचा तपशील :

१. अवैध दारू धंदे : ८१२ ठिकाणी छापे टाकून ८१८ आरोपींना अटक, ६.५९ कोटींचा माल जप्त.

२. अमली पदार्थविरोधी मोहीम : ५४ कारवायांमध्ये ८५ जणांना अटक करून ३.५९ कोटींचे ड्रग्ज हस्तगत.

३. अवैध धंदे : ६१ छापेमारीत २८३ आरोपी ताब्यात, ८२.७४ लाखांचा मुद्देमाल जप्त.

गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक वाढत्या गुन्हेगारीमुळे जिल्ह्याच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असले, तरी पोलिसांच्या धडाकेबाज कारवायांमुळे अवैध धंदेवाल्यांचे कंबरडे मोडले आहे. अमली पदार्थ आणि दारू तस्करांवर पोलिसांनी केलेल्या कठोर कारवाईमुळे गुन्हेगारांवर मोठा दबाव निर्माण झाला आहे. पालघर जिल्ह्याला गुन्हेगारीमुक्त करण्यासाठी पोलिसांकडून गस्त आणि प्रतिबंधात्मक कारवाया अधिक तीव्र केल्या जात आहेत.




## गाढ झोपेत कुटुंब अन् काळाचा घाला! गोरेगावमध्ये भीषण आगीत तिघांचा मृत्यू

■मुंबई। प्रतिनिधी,

गाढ झोपेत असलेल्या एका कुटुंबासाठी शनिवारची पहाट काळ ठरली. मुंबईतील गोरेगाव पश्चिमेकडील भगतसिंग नगर परिसरात मध्यरात्रीनंतर लागलेल्या भीषण आगीत एकाच कुटुंबातील तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून भीतीचं वातावरण पसरलं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गोरेगाव पश्चिमेतील भगतसिंग नगर येथील तळमजल्यावरील घरात आग लागली. ही घटना शनिवारी पहाटे सुमारे तीनच्या सुमारास घडली. पावस्कर कुटुंब घरात गाढ झोपेत असताना अचानक ही आग भडकली. आगीचे लोळ पाहताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीस धाव घेतली. अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच नागरिकांनी पाण्याच्या साहाय्याने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला; मात्र आग तीव्र असल्याने हे प्रयत्न अपुरे ठरले.

आगीची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दलाच्या ४ ते ५ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. वीजपुरवठा खंडित करून जवानांनी पाण्याच्या साहाय्याने आग आटोक्यात आणली. अग्निशमन दलाच्या जवानांनी तिघांना बाहेर काढून तातडीने ट्रॉमा केअर रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर तिघांनाही मृत घोषित केले. मृतांमध्ये संजोग पावस्कर (४८), हर्षदा पावस्कर (१९) आणि कुशल पावस्कर (१२) यांचा समावेश आहे.

**पुण्यात तरुणाचा खून**

दुसरीकडे, मोबाइलवर स्टेट्स ठेवत असल्याच्या किरकोळ कारणावरून खराडी परिसरात एकाचा डोक्यात दगड घालून खून केल्याची घटना घडली आहे. पोलिसांनी मारेकऱ्याला अटक केली आहे. आकाश ऊर्फ आक्या किसन तराळे (वय २५ , रा. खांदवेनगर, लोहगाव) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी अमित चंद्रकांत भोसले (वय ३५, रा. उबाळेनगर, वाघोली) याने फिर्याद दिली आहे. त्यावरून विजय ऊर्फ जलवा संजय वाघमारे (वय २३, रा. राजाराम पाटीलनगर, खराडी) याला अटक केली आहे. खराडी परिसरात फियार्दी भोसले आणि तराळे गुरुवारी रात्री गप्पा मारत बसले होते. त्या वेळी फियार्दीच्या ओळखीचा विजय वाघमारे हा तेथे आला आणि त्याने आकाश याला ह्यतू लय साबळेचे स्टेटस ठेवतो. सूरज साबळेचा मी बदला घेणार. तुझे काम तमाम करतो,ह्ल अशी धमकी दिली. त्यानंतर मोठा दगड उचलून डोक्यात घालून गंभीर जखमी केले. उपचार सुरू असताना आकाश याचा मृत्यू झाला.

## आली का नाहीस तू घरी? ३५ वर्षीय तरुणीला अटक

### समलिंगी संबंधातून मैत्रिणीला संपवलं, मुंबई हादरली

■मुंबई। प्रतिनिधी,

समलिंगी संबंधातून महिलेने मैत्रिणीची हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार मुंबईत समोर आला आहे. गुरुवारी रात्री सांताक्रूझ (पश्चिम) येथील एका घरात झालेल्या वादातून ही घटना घडली. पोलिसांनी ३५ वर्षीय कमला संजय कांबळे उर्फ प्रीती हिला अटक केली आहे. तिला १२ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

**काय आहे प्रकरण?**

मृत तरुणीचे नाव रेश्मा ढोणे असून ती ३७ वर्षांची होती. दोघी एकमेकींना दहा वर्षांहून अधिक काळापासून ओळखत होत्या. दोघी घरकाम करुन उदरनिर्वाह करत होत्या. प्राथमिक तपासात दोघी रिलेशनशीपमध्ये असल्याचं समोर आलं आहे. पूर्वीच्या भांडणामुळे त्यांच्यात तणावपूर्ण संबंध होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कमलाच्या घरी पार्टी सुरु असताना रात्री साडेअकरा वाजताच्या सुमारास दोघींमध्ये वाद सुरु झाला. रेश्मा तिच्या घरी न येण्यावरुन हा वाद सुरू झाला होता. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि रागाच्या भरात कमलाने घरात पडलेला चाकू उचलून रेश्माच्या छातीत खुपसला.

रेश्माच्या किंकाळ्या ऐकून शेजाऱ्यांनी पोलिसांना माहिती दिली. गस्तीवर असलेल्या पोलिसांनी जखमी अवस्थेत तिला रुग्णालयात नेले, मात्र तिथे तिला मृत घोषित करण्यात आले.

पोलिसांनी घटनास्थळावरून कमला कांबळेला ताब्यात घेतले आणि भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३ (हत्या) अंतर्गत अटक केली. रेश्माच्या मुलाच्या तक्रारीवरून एफआयआर नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास सुरू असल्याचे एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

कमलाने रेश्माला भेटायला न आल्याबद्दल जाब विचारल्यानंतर त्यांच्यात वाद सुरू झाला. हा वाद विकोपाला गेला, त्यानंतर कमलाने रेश्माच्या छातीत चाकूने वार केले, त्यामुळे तिचा मृत्यू झाला, असे सांताक्रूझ पोलिसांच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.




## महिलेवर बलात्कार अन् दगडाने ठेचून हत्या...

■नंदुरबार। प्रतिनिधी,

वाशिम जिल्ह्यातील रेल्वे स्थानक परिसरात आढळलेल्या अनोळखी महिलेच्या निर्घृण हत्येचा पोलिसांनी अवघ्या 24 तासांत छडा लावला असून या प्रकरणातील आरोपीला अकोला रेल्वे स्थानकावरून अटक करण्यात आली आहे. या घटनेत आरोपीने आधी बलात्कार करून नंतर महिलेची हत्या केल्याची कबुली दिल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे यांनी पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितले की, सर्वप्रथम मृत महिलेची ओळख पटवण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यानंतर रेल्वे स्थानक परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. फुटेजमध्ये एक संशयित व्यक्ती घटनास्थळाजवळ वावरताना दिसून आली. पोलिसांनी त्या व्यक्तीचा माग काढत चौकशी केली असता तो अमरावती जिल्ह्यातील अडूळा बाजार गावातील असल्याची माहिती मिळाली.पोलिसांचे पथक तात्काळ संबंधित गावात पोहोचले. मात्र तो संशयित गेल्या काही दिवसांपासून गावात नसल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे त्याचा संभाव्य ठावठिकाणा लक्षात घेऊन पोलिसांनी अकोला रेल्वे स्थानकावर पाळत ठेवली. काल रात्रीपासून वाशिम गुन्हे शाखेचे पथक अकोल्यात तैनात होते.

आज सकाळच्या सुमारास सीसीटीव्हीमध्ये दिसलेला संशयित अकोला रेल्वे स्थानकावर आढळून आला. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपले नाव संतोष रामराव खंडारे असल्याचे सांगितले. सखोल चौकशीदरम्यान आरोपीने संबंधित महिलेसोबत आधी अत्याचार केले आणि नंतर पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने तिची दगडाने ठेचून हत्या केल्याची कबुली दिली.

या घटनेने वाशिमसह संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिस पुढील तपास करत आहेत. आरोपीविरोधात गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला न्यायालयात हजर केले जाणार आहे.



**आधी अत्याचार केले अन् नंतर दगडाने ठेचून हत्या**

अधिकची माहिती अशी की, शुक्रवारी (दि.9) दुपारी वाशिम रेल्वे स्थानक परिसरात एका ट्रकजवळ महिलेचा मृतदेह पडून असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. माहिती मिळताच वाशिम शहर पोलीस आणि रेल्वे पोलिसांची संयुक्त टीम घटनास्थळी दाखल झाली. मृतदेहाची पाहणी केली असता सदर महिलेचे वय अंदाजे 45 ते 50 वर्षांच्या दरम्यान असल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. महिलेचे डोके मोठ्या दगडाने ठेचलेले असल्याने ही हत्याच झाल्याचे पोलिसांना लगेच समजले होते. त्यामुळे पोलिसांनी तातडीने तपास सुरु केला होता. तसेच मृतदेहावरील कपडे अस्ताव्यस्त अवस्थेत आढळल्याने महिलेवर लैंगिक अत्याचार झाल्याचीही शक्यता व्यक्त करण्यात आली होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली.



## संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# विकासासाठीचा आवाज गेला कुठे?



**महानगरपालिकांच्या निवडणुका सुरू असताना विकासाच्या मुद्द्यांवर ठोस चर्चा अपेक्षित असते. मात्र या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे आणि विरोधी नेते विकास आराखड्यांवर बोलणे टाळत का आहेत, हा प्रश्न अधिक ठळकपणे उपस्थित होत आहे.**

मुंबईसह राज्यात एकूण २९ महापालिकांच्या निवडणुकीचा संग्राम सुरू झाला आहे. या निवडणुकीत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र आले आहेत. या दोन बंधूंच्या एकत्र येण्याच्या निर्णयाचे स्वागतच आहे. मात्र माध्यमांनी या एकत्रीकरणाचे अवाजवी स्वागत केले. ही निवडणूक राज्यातील महानगरांच्या विकासाची चर्चा करणारी असावी याला मराठी प्रसारमाध्यमांनी प्राधान्य देणे अपेक्षित होते. मात्र मराठी प्रसारमाध्यमांना त्याचे महत्त्व वाटत नसावे अशी परिस्थिती आहे. असो. मुद्दा होता तो राज्यातील महानगरांच्या भविष्यकाळातील वाढीनुसार विकास आराखडा तयार करण्याचा, पण ज्येष्ठ नेते शरद पवार, उद्धव ठाकरे, राज ठाकरे, काँग्रेसचे बाळासाहेब थोरात ही नेतेमंडळी कोणत्याच निवडणुकीत राज्याच्या विकासाच्या मुद्द्यावर बोलायला तयार नसतात. देवेंद्र फडणवीस हे मात्र मुंबई आणि अन्य महापालिकांच्या निवडणुकीत विकासाच्या एकमेव मुद्द्यावर बोलण्याचे धाडस दाखवितात. देवेंद्र यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकीर्दीत (म्हणजे २०१४ ते २०१९) मुंबई, पुणे आणि नागपूर मेट्रोला मंजुरी मिळून हा प्रकल्प सुरूही झाला आहे. उद्धव ठाकरेंनी नेहमीप्रमाणे 'मुंबई महाराष्ट्रापासून तोडणार' हे बाल (रड) गीत सुरू केले आहे. देवेंद्र यांनी काही महिन्यांपूर्वी विधानसभेत केलेल्या भाषणात मुंबई आणि अन्य शहरांसाठी भविष्यकालीन योजनांविषयी भाष्य केले होते. मुंबईचा तसेच मुंबईलगतच्या पुणे, नाशिक या महानगरांचाही चेहरामोहराही बदलत आहे. मुंबईत आरे-कफ परेड या भुयारी मार्गावरील मेट्रो सुरूही झाली आहे. सी-लिंकचा वर्सोवा-दहिसर-भाईंदरपर्यंत विस्तार, दहिसरकडील नवीन लिंक रोड, फ्री-फ्लो ब्रिजेस, तसेच विविध टनेल प्रकल्पांमुळे मुंबईतील वाहतूककोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल अशी आशा आहे. सध्या मुंबईतील ६० टक्के वाहतूक पश्चिम द्रुतगती मार्गावर असल्याने या क्षेत्राला पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पुढील पाच वर्षांत मेट्रोचे संपूर्ण जाळे तयार होणार आहे. हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबईतील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम आणि वापरण्यास सोपी बनेल, सागरी सेतू आणि ट्रान्स हार्बर लिंकच्या माध्यमातून मुंबईकर तर सुसाट प्रवास करत आहेत. मुंबईतील पायाभूत सुविधा व सार्वजनिक वाहतुकींचे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबईच्या कोणत्याही टोकापासून दुसऱ्या टोकाला ५९ मिनिटांत पोहोचता येणार आहे. दरवर्षी किमान ५० किलोमीटरचे मेट्रो मार्ग तयार झाले पाहिजेत, असे उद्दिष्ट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई महानगर विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए)ला ठरवून दिले आहे. २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजप-शिवसेनेचे सरकार येण्यापूर्वी राज्यात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार होते. त्या सरकारने राज्यात ११ किलोमीटर लांबीची पहिली मेट्रो सुरू करण्यासाठी ११ वर्षे लावली. पण जेव्हा देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री महाराष्ट्राचे नेतृत्व स्वीकारले तेव्हा त्यांनी अत्यंत कमी कालावधीत जवळपास ३३७ किलोमीटरचा प्लॅन तयार करून त्यातील काही फेजमधील मेट्रो लाइन सुरू देखील केल्या. सर्वात जलद गतीने मेट्रोची कामे मार्गी लावून त्या लोकांसाठी उपलब्ध करून देण्याचा विश्वविक्रम फडणवीस सरकारने केला आहे. मुंबईकरांचा आणखी एक जिव्हाळ्याचा विषय म्हणजे घरांची उपलब्धता. त्यातही जुन्या घरांचा पुनर्विकास हा एक महत्त्वाचा मार्ग. भाजप महायुती सरकारने स्वयंपुनर्विकास धोरण आणून त्यातला एक महत्त्वाचा प्रश्न मार्गी लावला. वरळीतील बीडीडी चाळ पुनर्विकासातील घरांचा चावी वाटप सोहळा नुकताच संपन्न झाला आहे. शेकडो नागरिकांचे ५०० चौरस फूट घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे. बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पात एकूण १२१ चाळींचा पुनर्विकास होत आहे. या प्रकल्पात ४० मजल्यांच्या अशा ३३ इमारती बांधल्या जाणार आहेत. या इमारती, टॉवर भूकंपरोधक पद्धतीने बांधण्यात आल्या आहेत. तसेच बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातून तयार झालेल्या पहिल्या ५५६ पुनर्वसन घरांचे हस्तांतरण झाले असून उर्वरित प्रकल्प काम वेगाने सुरू आहे. २३ हजार कोटी रुपये खर्चाचा धारावी पुनर्विकास प्रकल्प तसेच वांद्रे येथील सरकारी वसाहतीच्या विकास प्रकल्पांनाही सरकारने चालना दिली आहे. या साऱ्यामुळे लवकरच मुंबईचा चेहरामोहरा बदलून जाईल. गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्नही याच सरकारने मार्गी लावला आणि गिरणी कामगारांना हक्काची घरे मिळण्यास सुरुवात झालेली आहे. पुण्यात मेट्रोचे दोन मार्ग सुरूही झाले आहेत. पुणे ते शिक्रापूर, पुणे ते खेड आणि पुणे ते यवत असे तीन उन्नत मार्ग करण्याचा निर्णय मोदी सरकारने घेतला आहे. राज्य सरकारकडून हडपसर ते यवत असा सहापदरी उन्नत मार्ग उभारण्याचे काम सुरू आहे. सोलापूर रस्त्यावर हा उन्नत मार्ग बांधण्यात येत आहे. हा मार्ग भैरोबा नाल्यापासून सुरू करण्याचे आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहेत. त्याचबरोबर या मार्गाबरोबरीने यवतपर्यंत मेट्रो सुरू करण्याच्या कामाचाही अंतर्भाव करण्यात आला आहे. पुणे ते शिरूर महामार्गावर ३५ किलोमीटर उन्नत महामार्गापैकी ७.४० किलोमीटर लांबीमध्ये जमिनीला समांतर रस्ता, त्यावर रस्ता व वरती मेट्रो अशा व्हाया डक्टची निर्मिती महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड आणि महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास मंडळ करणार आहे. समृद्धी महामार्गामुळे नागपूर-मुंबई प्रवास अवघ्या ८ तासांवर आला आहे. नागपूर मेट्रोही सुरू झाली आहे. नाशिक-अक्कलकोट ग्रीनफिल्ड कॉरिडॉरसारखे प्रकल्पही येत्या काही वर्षांत सुरू होतील. अशा प्रकल्पांची आणि राज्याच्या भविष्यकाळातील वाढीनुसार करावयाच्या विकासाची चर्चा करण्याचे धाडस विरोधक दाखवत नाहीत. कारण आपण सत्तेत असताना अशा प्रकल्पांच्या दिशेने काहीच केले नाही हे उद्धव ठाकरेंना, शरद पवारांना ठाऊक आहे. म्हणूनच विकासावर चर्चा करा, या देवेंद्र यांच्या आव्हानावर ही मंडळी चूप राहतात. त्यातूनच मग फेक नरेटिव्ह, बिनबुडाचे आरोप यांचे सत्र सुरू होते. याउलट भाजप केवळ आश्वासन देत नाही, तर नियोजन, निधी आणि कृतीच्या माध्यमातून विकास घडवते हे चित्र सर्वांसमोर आहे. महानगरांचे भविष्य सुरक्षित आणि समृद्ध करण्यासाठी अहोरात्र झटत महानगरांच्या विकासाला भाजपने नवी दिशा दिली आहे.

# राज्यातील चित्र-विचित्र युती आणि आघाड्या



**महाराष्ट्रात सुरू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत कोणाची युती कोणासोबत आणि कोणाची आघाडी कोणासोबत याचे काहीही नियम राहिले नाही. फक्त भारतीय जनता पक्षाने काँग्रेस आणि एमआयएमसोबत युती केली नाही, तर काँग्रेसने भाजपसोबत कुठे आघाडी केली नाही, असे चित्र होते. महापालिका निवडणुकीच्या प्रचाराच्या धामधुमीत नुकत्याच झालेल्या नगरपरिषद, नगरपंचायत निकालानंतर राज्यातील दोन ठिकाणांहून आलेल्या बातम्यांनी भाजप, काँग्रेस, एमआयएम आघाडीचाही विचित्र प्रयोग महाराष्ट्राने पाहिला. सत्तेसाठी कोणतेच धरबंद राजकीय नेत्यांना राहिले नाही हे त्यांनी दाखवून दिले.**

महापालिका निवडणुकीच्या मतदानाला आता अवघे पाच-सहा दिवस उरले आहेत. या निवडणुका कुठे आठ तर कुठे दहा वर्षांनी होत आहेत. त्यातच मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका एकत्रित होत आहे, त्यामध्ये जालना आणि इचलकरंजी या दोन नवीन महापालिकांचा समावेश आहे. यामुळे फक्त महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशाचे लक्ष या निवडणुकांकडे आहे. तरी नशीब, राष्ट्रीय पक्षांचे राष्ट्रीय नेते या निवडणुकीच्या प्रचाराला अजून उतरले नाही. मात्र त्यांच्या नावाने, त्यांच्या प्रतिमा आणि त्यांनी केलेल्या न केलेल्या विकासकामांचा दाखला राज्यातील आणि स्थानिक नेत्यांकडून नाक्या नाक्यावरच्या सभांमध्ये दिला जातोय. राज्यात प्रामुख्याने महायुती आणि महाविकास आघाडी या दोन प्रमुख आघाड्या आहेत. यातील एकही युती किंवा आघाडी पूर्णपणे या महापालिकांच्या निवडणुकांमध्ये एकत्र आलेली नाही. त्यामुळे राज्यात चित्र-विचित्र युती आणि आघाड्या झाल्या आहेत. याचे परिणाम या निवडणुकीच्या प्रचारातच दिसून आले.

भाजपने शत-प्रतिशतचा नारा दिलेला आहे. त्याचा अर्थ ग्रामपंचायतीपासून संसदेपर्यंत फक्त आम्हीच जिंकलो पाहिजे. यासाठीच कदाचित अकोला जिल्ह्यातील अकोट नगरपालिका निवडणुकीनंतर सत्ता स्थापनेसाठी भाजपने त्यांचे घणघोर विरोधी ऑल इंडिया मजलीस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन सोबत (एआयएमआयएम) आघाडी केली. सत्तेसाठी काहीपण, याचे हे उत्तम उदाहरण समोर आले. अकोटमध्ये झालेल्या नगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या माया धुळे या नगराध्यक्ष बनल्या. मात्र भाजपला नगरसेवकांचे बहुमत नव्हते. बहुमताचा आकडा गाठण्यासाठी तिथे अकोट विकास मंच स्थापन करण्यात आला. येथेही नाव पुन्हा एकदा विकासाचेच. या विकास मंचात भाजपचे ११ नगरसेवक आणि दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या एमआयएमचे ५ नगरसेवक सहभागी झाले.

भाजप आणि एमआयएम एकत्र एवढ्यावरच ही आघाडी थांबली नाही तर जिथे दोन्ही शिवसेनेचे नेते एकमेकांच्या सावलीला उभे राहत नाही ते देखील विकासाच्या नावाने स्थापन झालेल्या मंचावर एकत्र आले. राष्ट्रवादीचे दोन्ही अध्यक्ष तर काका-पुतण्याच आहेत. दोन्ही पवारांनी पुणे, पिंपरी-चिंचवडमध्ये आघाडी केली आहेच, त्यात विकासासह सत्तेसाठी पुन्हा एकदा पवार काका पुतण्याची राष्ट्रवादी या मंचात एकत्र आली. तसेही सत्तेपासून दूर राहील ती राष्ट्रवादी काय! उरले फक्त प्रहार जनशक्तीचे नगरसेवक, त्यांनीतरी मागे का राहायचे म्हणत सत्तेत सहभागी झाले. ३३ सदस्यांच्या अकोट नगरपालिकेत अकोट विकास मंचाकडे आता २५ नगरसेवकांसह नगराध्यक्ष माया धुळे असे एकूण २६ सदस्य झाले. राहिले फक्त काँग्रेसचे ६ आणि वंचित बहुजन आघाडीचे २, या ८ नगरसेवकांनी विरोधात राहण्याचा निर्णय घेतला. वास्तविक त्यांना विकास मंचात सहभागी करून घेतले नाही म्हणून ते बाहेर राहिले का हाही संशोधनाचा विषय आहे. कारण भाजपने काँग्रेससोबतही थेट आघाडी केली आहेच. त्याबद्दल पुढे चर्चा करूच.

भाजप, एमआयएम, दोन्ही शिवसेना, दोन्ही राष्ट्रवादी आणि बच्चू कडूंचा प्रहार जनशक्ती अशी ही विकासाची खिचडी स्थानिक भाजप नेत्यांनी शिजवली. देवेंद्र फडणवीसांनी एमआयएमसोबत आघाडीला स्पष्ट नकार दिला. एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी भाजपसारख्या जाती-धर्मांत भांडणे लावणाऱ्या पक्षांसोबत आम्ही जाणार नाही, हे स्पष्ट केले. मात्र तोपर्यंत अकोट विकास मंच अकोला जिल्हाधिकाऱ्यांकडे नोंदणीकृत झालेला होता. राज्यात सुरू असलेल्या महापालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मुख्यमंत्री फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाणांनी डोळे वटारले. ही युती तत्वशून्य असल्याचे सांगत, अशी युती होऊ शकत नसल्याचे म्हटले. अकोटचे आमदार प्रकाश भारसाकळे यांना चव्हाणांनी कारणे दाखवा नोटीस बजावली.

खरं तर हा पेच निर्माण झाला जनतेतून निवडलेल्या नगराध्यक्षामुळे. अकोट आणि अंबरनाथ नगरपरिषदेत नगराध्यक्ष भाजपचा विजयी झाला. मात्र त्यानंतर उपनगराध्यक्ष, आरोग्य, पाणीपुरवठा, महिला बालकल्याण यासारख्या समित्या आणि स्वीकृत सदस्यांसाठी आपले वर्चस्व राहिले पाहिजे यासाठी ही अभद्र युती करण्यात आली. जर महापालिका निवडणूक नसती तर यासंबंधीची बातमी ही अकोट आणि अकोल्याच्या स्थानिक वृत्तपत्रांपलीकडे पुढे विदर्भातही फारशी कळली नसती. त्याचे कारण म्हणजे, भाजप खासदार अनुप धोत्रे यांनी म्हटले की, एमआयएमचे नगरसेवक भाजपमध्ये आले असते तर आम्हाला हरकत नव्हती. हाच न्याय खासदार धोत्रे एमआयएमचे अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवैसी यांना लावणार का?

ज्या पक्षाच्या विरोधात तुम्ही लढले, त्यांच्या ध्येयधोरणांवर टीका केली. त्यांची भाषा, पोशाख, त्यांच्या खानपानावरून उठता बसता तुम्ही त्यांना पाकिस्तानात चालते व्हा म्हणता. फक्त तुमच्या सत्तेसाठी त्यांनी पक्षबदल केला असता तर ते तुमच्यासाठी 'पाक' होणार असतील तर मग, आधीच त्यांनाच तिकीट देऊन तिथून का निवडून आणले नाही? फडणवीसांनी भाजप आमदार, खासदारांना तर ओवैसींनी एमआयएमच्या नगरसेवकांना खडसावले. त्यानंतर पाचही नगरसेवकांनी आघाडीत सहभागी नसल्याचे पत्र दिले. एमआयएमचे नगरसेवक बाहेर पडल्याने प्रश्न सुटत नाही. आता येथे विषय समित्या आणि उपनगराध्यक्ष कसा निवडला जाणार, सत्ता कशी स्थापन होणार, या प्रश्नांची उत्तरे कोण देणार आहे? नगरपालिका, पंचायत समिती, ग्रामपंचायतीमध्येही जर राष्ट्रीय पक्ष सत्तेची हाव ठेवून लढणार असतील तर अशा विचित्र आघाड्या आणि अभद्र युती होणारच.

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ नगर परिषदेमध्ये भाजपने थेट त्यांचे बाय बॉर्न विरोधक काँग्रेससोबत आघाडी केली. मात्र येथे भाजपने पदाधिकारी, नगरसेवकांवर कुठलीही कारवाई केली नाही. येथे कारवाई केली ती काँग्रेसने त्यांच्या १२ नगरसेवक आणि शहराध्यक्षावर. अंबरनाथमध्ये एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला दूर ठेवण्यासाठी भाजपने काँग्रेससोबत अभद्र संग केला. येथे शिंदेच्या शिवसेनेकडे २७, भाजपकडे १४, काँग्रेसचे १२, अजित पवार गटाचे चार आणि दोन अपक्ष असे ५९ नगरसेवक निवडून आले. राज्यात आणि केंद्रात सत्तासोबत करणाऱ्या एकनाथ शिंदेंना अंबरनाथमध्ये दूर ठेवण्यासाठी ही अभद्र आघाडी करण्यात आली. ही अभद्र आघाडी जेवढी काँग्रेसच्या जिव्हारी लागली तेवढे आश्चर्यदेखील भाजपला झाले नाही. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या चिन्हावर निवडून आलेल्या १२ नगरसेवकांना निलंबित केले. पक्षाचे शहराध्यक्ष प्रवीण पाटील यांच्यावरही कारवाई करण्यात आली. मात्र भाजपने असे काहीच केले नाही, तर त्यांनी काँग्रेसने निवडून आणलेल्या १२ नगरसेवकांच्या गळ्यात भाजपचे उपरणे टाकून त्यांना आपलं करून घेतलं. मात्र सत्तास्थापन करण्यासाठी मित्रपक्ष शिंदेसेनेकडे हात पुढे केला नाही.

आता काँग्रेस हा सगळा प्रकार पूर्णपणे बेकायदेशीर असून या सर्व १२ नगरसेवकांचे सदस्यत्व रद्द करण्यासाठी कायदेशीर कारवाई करणार असल्याचे म्हणत आहे. मात्र कायदेशीर कारवाईचा शिवसेना आणि राष्ट्रवादीचा पूर्वेतिहास आपल्यासमोर आहे. तीन चार वर्षानंतरही अजूनही खटला सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे. विधानसभाध्यक्षांनी कोणीही अपात्र नाही असा निर्णय देऊन शिंदेसेनेच्या ४० आमदारांना सुरक्षित केले होते. त्यामुळे कायदेशीर लढाईत काय होणार, हे वेगळे सांगायची गरज नाही. सध्या महापालिका निवडणुका सुरू असल्यामुळे भाजपने अकोटमध्ये कारवाईचा बडगा उगारला. अंबरनाथमध्ये काँग्रेसने निलंबित केलेल्या नगरसेवकांना भाजपमय करून घेतले, पण शिंदेसेनेला जवळ केले नाही. एकीकडे भाजपचे नेते कुबड्यांची गरज नाही म्हणत त्या फेकून देण्याची भाषा करतात आणि दुसरीकडे ज्या कुबड्यांच्या सहकार्याने राज्यात, केंद्रात सत्तेत आहेत, त्यांना स्थानिक निवडणुकांत फेकून देतात. हा विरोधाभास आणखी किती काळ या पक्षांना सहन करावा लागणार आहे. आश्चर्य म्हणजे त्यांना याचा त्रास होतोय की नाही हाही खरा प्रश्न आहे. कारण फेकून मारले तरी बसायला टाकले असेच सांगत यांचा संसार सुरू आहे.

आता महापालिका निवडणुकीत अंबरनाथमध्ये ज्यांना सत्तेपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला त्यांच्यासोबतच मुंबई आणि ठाण्यात भाजपची युती आहे. पुणे, संभाजीनगरसारख्या महत्त्वाच्या महापालिकांमध्ये भाजप स्वबळावर लढत आहे, तर त्यांचे सत्तेतील भागीदार नव्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन लढत आहेत. फक्त भाजपने काँग्रेस, वंचित आणि एमआयएमसोबत निवडणूकपूर्व युती केलेली नाही. या निवडणुकीत एकमेकांविरोधात लढलेले सगळे पक्ष निकालानंतर एक झालेले दिसले तर त्यात महाराष्ट्राला नवल वाटायला नको, कारण सर्वकाही विकासासाठी!

# भाषाविकासाची आनंददायी वाट!




अनेक मुलांकडे सभाधीटपणाचा अभाव असल्याने ती बाहेर विशेष बोलत नाहीत आणि विशेष बोलकी नसल्याने शाळेत ती मागेमागेच राहतात. त्यांना बोलते करण्यासाठी वेळीच प्रयत्न केले नाहीत, तर ती अशीच घुमी राहण्याची शक्यता जास्त असते, अशा वेळी त्यांना बोलके करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे मुलांना बालनाट्यातून सामावून घेणे आणि हे करताना मुलांची मायभाषा त्यांना खूप मदत करू शकते. एकतर घरातच बोलली जाणारी भाषा त्यांच्या अंगवळणी सहज पडते आणि मुले उत्स्फूर्तपणे व्यक्त होऊ शकतात. स्वानुभवातून मी हे सांगू शकते. माझ्या मुलीला तिची अभिव्यक्ती करताना कुठलीही अडचण येऊ नये म्हणून मी तिला लहानपणीच बालनाट्यात गुंतवले. प्रारंभी मी तिला वेगवेगळी बालनाट्ये दाखवायला सुरुवात केली. 'दुर्गा झाली गौरी'मधली गाणी गुणगुणताना गंमत म्हणजे ती दुर्गाच अधिक व्हायची. सुरुवातीला प्रेक्षकाच्या भूमिकेतच असणारी माझी मुलगी इतकी रमली, की ते पाहून मी तिला बालनाट्याच्या कार्यशाळेत पाठवायला सुरुवात केली. छोटे-छोटे संवाद लिहिणे, प्रत्यक्ष नाटकातील दृश्य साकारणे, सर्वांसोबत समूहात सहभाग घेणे, शब्दोच्चार, आवाज आणि लयीचे भान या सर्व गोष्टींची जाण तिला बालनाट्य प्रशिक्षणातून आली. भीती ही गोष्ट कशी घालवायची, याचा जादुई मार्ग तिला सापडला होता. हळूहळू नाटुकले रचण्याचा तिला छंदच जडला. तिची भाषा घडण्याची प्रक्रिया इतक्या वेगाने सुरू झाली, की ती आपसुकच कविताही रचू लागली. बालनाट्यातून घडलेल्या तिच्या जडणघडणीत राजू तुलालवार सरांचे श्रेय मोठे आहे. लेकीचा भाषाविकास पाहिल्यावर एकूण अभ्यासक्रमाशी शालेय जीवनातच बालनाट्याचा संबंध जोडण्याचे महत्त्व माझ्या लक्षात आले. शिक्षकांनी आपल्या अध्यापन प्रक्रियेत बालनाट्याचा योग्य आणि कल्पक उपयोग केला तर अधिक चांगल्याप्रकारे ते मुलांपर्यंत विषय पोहोचवू शकतात. त्यामुळे मुलांसाठी कार्यशाळा आयोजित करणे जितके उपयुक्त तितकेच पालकांनी मुलांना नाटक दाखवणेही तितकेच महत्त्वाचे! मुलांच्या भाषाविकासाचा गाभा समजून घेतला तर तिथपर्यंत पोहोचण्याच्या विविध वाटा पालक शिक्षकांना शोधता येतील. बालनाट्य ही अशीच एक आनंददायी आणि खेळकर वाट!



# निसर्गाचा एक सजग पहारेकरी हरपला

भारतीय पर्यावरण चळवळीतील हिरव्या विचारांचा एक तेजस्वी दीपस्तंभ आज हरपला आहे. माधव गाडगीळ यांच्या निधनाने निसर्ग, लोकशाही आणि विकास यांच्यात समतोल साधण्याचा निर्भीड, विवेकी आवाज शांत झाला आहे.

भारतीय पर्यावरण चळवळीने आज एक विचारवंत, शास्त्रज्ञ आणि निर्भीड नैतिक आवाज गमावला आहे. माधव गाडगीळ यांचे निधन म्हणजे केवळ एका व्यक्तीचे जाणे नाही, तर निसर्गाशी संवाद साधणाऱ्या, विकासाला प्रश्न विचारणाऱ्या आणि लोकशाही पर्यावरणवादाचा आग्रह धरणाऱ्या विचारपरंपरेचे मोठे नुकसान आहे. त्यांनी पर्यावरण संवर्धनाकडे केवळ भावनिक किंवा आदर्शवादी दृष्टिकोनातून पाहिले नाही, तर तो सामाजिक न्याय, अर्थकारण आणि लोकसहभाग यांच्याशी जोडून पाहिला. त्यामुळेच त्यांचे कार्य आज अधिकच अर्थपूर्ण वाटते.

पश्चिम घाट हा त्यांच्या चिंतनाचा आणि संघर्षाचा केंद्रबिंदू होता. अनेकांसाठी तो केवळ निसर्गसौंदर्याचा प्रदेश असला, तरी गाडगीळ यांच्यासाठी तो देशाच्या पर्यावरणीय सुरक्षिततेचा कणा होता. पावसाचे पाणी अडवणारे डोंगर, नद्यांना जीवन देणारी जंगले आणि हजारो प्रजातींचे आश्रयस्थान असलेला हा भाग अंध विकासाच्या झटक्यात नष्ट होऊ शकतो, याची जाणीव त्यांनी फार आधी करून दिली. विकास आणि संवर्धन यांच्यातील संघर्ष कृत्रिम आहे, असा त्यांचा ठाम विश्वास होता. निसर्ग नष्ट करून मिळवलेली प्रगती ही अल्पकालीन असून तिची किंमत भविष्यात समाजालाच मोजावी लागते, हे त्यांनी सातत्याने अधोरेखित केले.

पश्चिम घाटावरील तज्ञ समितीच्या अहवालामुळे गाडगीळ व्यापक चर्चेत आले. या अहवालाने विकासाच्या प्रचलित संकल्पनांना आव्हान दिले. पर्यावरण-संवेदनशील क्षेत्रांची ओळख पटवून तिथे विकासावर मर्यादा घालण्याची सूचना त्यांनी केली. हा अहवाल अनेकांना अस्वस्थ करणारा ठरला, कारण तो सत्ताकेंद्रांना प्रश्न विचारणारा होता. तरीही, हा दस्तावेज शाश्वत विकासाचा एक महत्त्वाचा संदर्भबिंदू बनला. तो नाकारला गेला, दुर्लक्षित झाला; पण इतिहासात तो दूरदृष्टीचा म्हणून नोंदवला जाईल, यात शंका नाही.

गाडगीळ यांचे संवर्धनविषयक तत्त्वज्ञान केवळ जंगलांपुरते मर्यादित नव्हते. त्यांनी नेहमीच सांगितले की निसर्ग वाचवायचा असेल तर त्या निसर्गात राहणाऱ्या लोकांना केंद्रस्थानी ठेवले पाहिजे. स्थानिक समुदायांना बाजूला सारून केलेले संवर्धन टिकत नाही, असा त्यांचा अनुभव होता. उलट, योग्य माहिती, अधिकार आणि जबाबदारी दिल्यास स्थानिक लोक हेच पर्यावरणाचे सर्वात विश्वासू रक्षक ठरू शकतात. त्यामुळे त्यांनी लोकसहभाग, नागरिक विज्ञान आणि तळागाळातील निर्णयप्रक्रियेचा आग्रह धरला.

पर्यावरण-संवेदनशील क्षेत्रांची संकल्पना मांडताना त्यांनी विकासविरोधी भूमिका घेतली, असा आरोप अनेकदा झाला. प्रत्यक्षात, त्यांचा विरोध विकासाला नव्हे, तर बेदरकारपणाला होता. प्रत्येक मोकळ्या जागेवर काँक्रीट ओतणे, डोंगर फोडणे, नद्यांचे प्रवाह बदलणे- या सगळ्याचे दीर्घकालीन परिणाम काय असू शकतात, याचा विचार न करता घेतलेले निर्णय त्यांनी धोकादायक ठरवले. निसर्ग आणि अर्थव्यवस्था यांच्यात समतोल राखणे शक्य आहे, फक्त त्यासाठी दूरदृष्टी आणि संयम आवश्यक आहे, हा त्यांचा आग्रह होता.

जलसंपदा व्यवस्थापन हा त्यांच्या अभ्यासाचा आणखी एक महत्त्वाचा भाग होता. पाणी हा बाजारात विकत घेण्याचा माल नसून तो प्रत्येकाचा मूलभूत हक्क आहे, ही भूमिका त्यांनी ठामपणे मांडली. नद्यांचे संवर्धन, जलसंधारण, पावसाचे पाणी अडवणे आणि स्थानिक पातळीवर जलनियोजन यावर त्यांनी भर दिला. जलसंकट हे केवळ नैसर्गिक नसून ते मानवनिर्मित आहे, हे त्यांच्या लेखनातून आणि कामातून स्पष्ट होते.

हवामान बदलाच्या संदर्भात गाडगीळ हे काळाच्या पुढे विचार करणारे होते. जागतिक तापमानवाढ, बदलते पावसाचे स्वरूप आणि अधिवासांचा ऱ्हास यांचे परिणाम किती गंभीर असू शकतात, याची त्यांनी लवकरच जाणीव करून दिली होती. हवामान बदल हा केवळ वैज्ञानिक विषय नसून तो सामाजिक, आर्थिक आणि नैतिक प्रश्न आहे, असे ते मानत. वेळेत पावले उचलली नाहीत तर त्याची किंमत केवळ मानव नव्हे तर संपूर्ण जीवसृष्टीला मोजावी लागेल, हा त्यांचा इशारा आज अधिकच खरा ठरत आहे.

जंगलतोडीबाबत त्यांची भूमिका अत्यंत स्पष्ट होती. अल्पकालीन नफ्यासाठी जंगले नष्ट करणे म्हणजे भविष्यातील आपत्तीला आमंत्रण देणे, असे ते सांगत. भूस्खलन, दुष्काळ, पूर, जैवविविधतेचा ऱ्हास- या सगळ्यांची मुळे जंगलांच्या विनाशात दडलेली आहेत. झाडे म्हणजे विकासातील अडथळे नसून ती स्थिर आणि सुरक्षित भविष्यासाठीची गुंतवणूक आहेत, हा त्यांचा संदेश होता.

शहरीकरणाबाबतही त्यांनी महत्त्वाची मते मांडली. शहरांनी निसर्गाशी संघर्ष न करता त्याच्याशी सुसंवाद साधला पाहिजे. हरित क्षेत्रे, नैसर्गिक निचरा व्यवस्था आणि स्थानिक परिसंस्थांचा सन्मान करणारे नियोजन हेच शाश्वत शहरी विकासाचे आधारस्तंभ असू शकतात, असे ते मानत.

पारंपरिक ज्ञानाबद्दल त्यांना विशेष आदर होता. आधुनिक विज्ञान महत्त्वाचे असले तरी शतकानुशतके वापरात असलेल्या स्थानिक पद्धतींमध्येही शाश्वततेची उत्तरे दडलेली आहेत, हे त्यांनी दाखवून दिले. शेती, वनव्यवस्थापन किंवा जलसंधारण- या सगळ्या क्षेत्रांत पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक विज्ञान यांचा संवाद घडवण्यावर त्यांनी भर दिला.

खाणकाम आणि औद्योगिकीकरणाच्या बाबतीत त्यांनी टोकाची भूमिका घेतली नाही. उद्योग आवश्यक आहेत, पण ते पर्यावरण आणि समाज यांच्या मर्यादा ओलांडून चालता कामा नयेत, ही त्यांची भूमिका होती. अनियंत्रित खाणकामामुळे निसर्गाचा ऱ्हास, स्थानिक लोकांचे विस्थापन आणि संसाधनांचा अपव्यय कसा होतो, हे त्यांनी स्पष्टपणे मांडले.

सरकार आणि धोरणकर्त्यांबाबत ते केवळ टीकाकार नव्हते, तर जबाबदारीची जाणीव करून देणारे होते. मजबूत पर्यावरणीय कायदे, प्रभावी अंमलबजावणी आणि पारदर्शकता याशिवाय शाश्वतता शक्य नाही, असा त्यांचा विश्वास होता. पर्यावरण संरक्षण ही केवळ घोषणांची बाब नसून ती राजकीय इच्छाशक्ती आणि सार्वजनिक सहभागाची कसोटी आहे, हे त्यांनी वारंवार सांगितले.

माधव गाडगीळ यांचा वारसा म्हणजे प्रश्न विचारण्याची हिंमत, निसर्गाशी नम्रतेने वागण्याची शिकवण आणि विकासाच्या संकल्पनेला मानवी चेहरा देण्याचा प्रयत्न. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून काढणे कठीण आहे. मात्र, त्यांनी दाखवलेला मार्ग, त्यांनी रोवलेले विचार आणि त्यांनी जागवलेली जाणीव- हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. निसर्ग जपणे म्हणजे भविष्य जपणे, हा धडा त्यांनी आपल्याला दिला आहे. तो विसरणे हीच त्यांच्याशी केलेली सर्वात मोठी बेईमानी ठरेल.

## तवा राईस

**सामग्री :** २ वाटी शिजवलेला भात, २ अख्ख्या लाल मिरच्या, १ चमचा आले-लसूण पेस्ट, फोडणीसाठी तेल, बारीक चिरलेला एक कांदा, गाजर, टोमॅटो (इच्छेप्रमाणे), अर्धा वाटी मटार, १/२ चमचा पाव भाजी मसाला, १/४ चमचा हळद पावडर, १/२ चमचा तिखट, मीठ स्वादानुसार.

**कृती :** सर्वात आधी गाजर आणि मटार उकळून घ्यावे जेणेकरून नरम होतील. एक मोठ्या पॅनमध्ये तेल गरम करून त्यात जिरं, अख्ख्या लाल मिरच्या आणि पाव भाजी मसाला टाका. नंतर कांदा, आले-लसूण पेस्ट टाकून मिक्स करा. नंतर टोमॅटो टाकून हलवून घ्या. शिजल्यासारखं वाटल्यावर त्यात मटार आणि गाजर टाका. नंतर हळद, तिखट, गरम मसाला, मीठ टाका. आता भात टाकून हलक्या हाताने हलवून घ्या. वरून कोथिंबीर, लिंबाने सजवून घ्या. दह्यासोबत सर्व्ह करा.



## केमिकल पिलिंग केल्यानंतर कशी घ्याल चेहऱ्याची काळजी ?



चेहऱ्यावरील काळे डाग कमी करण्यासाठी, चेहरा उजळावा याकरिता केमिकल पिल्स फायदेशीर ठरतात. केमिकल पिल्समुळे त्वचेवरील निस्तेज आणि मृत स्तर काढायला मदत होते. त्यामुळे त्वचा अधिक तजेलदार होते. चेहऱ्यावर लावले जाणारे केमिकल त्वचेतील टिश्यूंचे नुकसान टाळण्यास मदत करतात. केमिकल पिलमध्ये ॲसिड, फळांचा, बोटॅनिकल एक्सट्रॅक्ट किंवा दुधाचा समावेश असतो. त्वचेच्या पोतनुसार आणि समस्येनुसार कोणते पिल वापरावे याचा निर्णय डॉक्टर घेतात. केवळ केमिकल पिल लावून तुम्हाला अपेक्षित निकाल मिळत नाहीत, तर त्यानंतरही त्वचेची काळजी घेणं आवश्यक आहे. यासाठी प्रसिद्ध सेलिब्रिटी डरमॅटोलॉजिस्ट डॉ. जयश्री शरद यांनी दिलेला हा खास सल्ला नक्की जाणून घ्या.



- पिल लावल्यानंतर लगेचच आईस कॉम्प्रेसेस चेहऱ्यावर फिरवावे. किमान १०-१५ मिनिटे आईस कॉम्प्रेस चेहऱ्यावर ठेवा.
- केमिकल पिलनंतर किमान १० दिवस चेहऱ्याला स्क्रब किंवा गरम पाणी लागणार नाही याची काळजी घ्या. या दिवसांत चेहऱ्याला स्क्रब आणि गरम पाणी वापरू नका.
- सौम्य, न्यूट्रल pH फेशिअल क्लिंजरचा वापर करा. चेहरा स्वच्छ करण्यासाठी sebamed olive wash dla वा Cetaphil cleansing lotion चा वापर करावा.
- केमिकल पिल ट्रीटमेंट केल्यानंतर लगेचच तसेच सनस्क्रीन न लावता बाहेर पडू नका. उन्हात फिरत असल्यास किमान दोन-दोन तासांनी सतत सनस्क्रीन लावा.
- केमिकल पिल ट्रीटमेंटनंतर दोन दिवसांनी चेहऱ्यावर मॉईश्चरायझर लावायला सुरुवात करा.
- केमिकल पिलनंतर काही तासांतच त्वचेवरून एक पातळ स्तर निघायला सुरुवात होते. तो स्तर काढण्यासाठी सतत चेहऱ्याला हात लावू नका किंवा त्वचा खेचू नका.
- स्कीन पिलिंग होताना ब्लिचिंग किंवा केस काढण्यासाठी थ्रेडिंग, वॅक्सिंग करणे टाळा.
- पिलिंग होताना ॲण्टी ॲक्ने क्रीमचा वापर करू नका. तसेच स्क्रीन लाईटिंग क्रीम वापरणे टाळा.

## वारंवार तोंड येत असल्यास आजमावा हे उपाय

**पचनक्रिया** व्यवस्थित नसेल, किंवा शरीरामध्ये काही कारणाने उष्णता वाढली असेल, तर वारंवार तोंड येऊ लागते. यालाच 'माऊथ अल्सर्स' असेही म्हटले जाते. अनेकदा काही कारणासाठी घेतलेली औषधे उष्ण पडल्यानेही तोंड येऊ शकते. तोंड आले असता काही खाणे-पिणे कठीण होऊन बसते. जिभेवर बारीक फोड येतात आणि क्वचित वेदनाही होतात. बहुतेक वेळी बी कॉम्प्लेक्स घेतल्याने माऊथ अल्सर्स थोड्याच अवधीत बरे होतात. त्याच्या जोडीने काही घरगुती उपायांचा अवलंब करूनही हे माऊथ अल्सर्स बरे करता येऊ शकतात.

तुळस स्वास्थ्यवर्धक असून, यामध्ये वेदनाशमक गुण आहेत. तसेच शरीरातील उष्णता कमी करण्यासही तुळस सहाय्यक आहे. तोंड आले असता दिवसातून तीन ते चार वेळा तुळशीची पाने चावून खाल्ल्याने आराम मिळतो. जर पचनक्रिया सुरळीत नसल्याने शरीरातील उष्णता वाढून तोंड आले असले, तर ते बरे करण्यासाठी खसखस उपयुक्त ठरते. थोडी खसखस चावून खाल्ल्याने शरीरातील उष्णता कमी होऊन तोंडातील अल्सर्स लवकर निवळतात.

नारळाचे तेल आणि नारळाचे पाणी हे दोन्ही तोंडातील अल्सर ठीक करण्यासाठी अतिशय गुणकारी आहेत. नारळाच्या पाण्याने शरीरातील उष्णता दूर होत असून, नारळाचे तेल तोंडात धरून चूळ भरल्याप्रमाणे खुळखुळविल्यानेही तोंडातील अल्सर ठीक होण्यास मदत होते. याला 'ऑईल पुलिंग' म्हटले जाते. जिथे अल्सर आहेत त्यावरून नारळाचा चव लावल्यानेही तोंडातील अल्सर बरे होतात. त्याचप्रमाणे ज्येष्ठ मधाच्या पुडीमध्ये थोडासा मध घालून तोंडामध्ये आणि जिभेवर



## फुफ्फुसाचा कर्करोग टाळण्यासाठी योग उपयुक्त



**फुफ्फुसाचा** कर्करोग हा जगामध्ये सर्वात जास्त आढळणाऱ्या कर्करोगांपैकी एक आहे. केवळ २०१८ या एकाच वर्षामध्ये जगभरामध्ये २,०९३,००० रुग्णांना फुफ्फुसाचा कर्करोग असल्याचे निश्चित निदान केले गेले. वास्तविक हा रोग महिलांच्या मानाने पुरुषांमध्ये अधिक आढळून येत असे. पण सध्याच्या काळामध्ये वाढते प्रदूषण, बदललेल्या जीवनशैली यामुळे हा रोग आता महिलांमध्येही आढळून येऊ लागला आहे. फुफ्फुसाच्या कर्करोगाचे चार प्रकार असून, यामध्ये 'अडेनोकार्सीनोमा' आणि 'स्क्वामस सेल कार्सीनोमा' हे दोन प्रकार जास्त आढळून येणारे आहेत. सध्याच्या प्रगत काळामध्ये फुफ्फुसाचा कर्करोग योग्य उपचार करून बरा होण्यातला असला, तरी मुळात या कर्करोगाचे निदान वेळेवर होणे अत्यावश्यक असते. या रोगाची अनेक लक्षणे असून, दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ सतत खोकला येणे, हात आणि बगलांमध्ये वेदना, मान आणि पाठदुखी, दम लागणे, अचानक वजन जलद घटू लागणे, थुंकीतून रक्त पडणे आणि सतत सुस्ती जाणवणे ही या रोगाची काही प्रमुख लक्षणे आहेत. या रोगावर निश्चित उपचार शोधीत असतानाच, सामन्य 'ॲलोपथीक' उपचार पद्धतीच्या जोडीनेच वैद्यकीय तज्ज्ञ इतर उपचार पद्धतींकडेही पाहत आहेत. या पद्धतींमध्येच योगसाधना फुफ्फुसाच्या कर्करोगावर अतिशय प्रभावी उपाय असल्याचे दिसून आले आहे. या संबंधी रिसर्च अमेरिकेमध्ये सुरू असून, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ येथील २६ रुग्णांवर केमोथेरपी आणि इतर उपचारांच्या सोबतच योगसाधनेद्वारेही यशस्वी उपचार करण्यात येत आहेत. या सर्व रुग्णांवर योगसाधनेचा प्रभाव इतका चांगला झाला, की कर्करोगातून पूर्ण बरे झाल्यानंतरही आता यातील अनेक रुग्णांनी योगसाधनेचा अवलंब त्यांच्या जीवनशैलीमध्ये कायमस्वरूपी केला असल्याचे समजते. योगसाधनेमुळे शरीर तणावरहित होत असून, जे रुग्ण केमोथेरपी किंवा रेडिएशन थेरपीसारखे उपचार घेत होते, त्यांच्यासाठी योगसाधना विशेष फायद्याची ठरली आहे. तसेच या रुग्णांच्या वैयक्तिक शारीरिक क्षमता आणि आवश्यकता लक्षात घेऊन त्यानुसार योगासने त्यांना शिकविली गेल्याने त्याचा या रुग्णांना विशेष लाभ झाल्याचे पहावयास मिळत आहे.

## व्यवस्थित काम करत असलेला स्मार्टफोन तुमच्या 'या' सवयींमुळे होतो खराब

अनेक वेळा स्मार्टफोन योग्य काळजी न घेतल्यामुळे देखील अचानक खराब होतो आणि फोनवर केलेला खर्च व्यर्थ झाल्यासारखा वाटतो. पण, स्मार्टफोन नीट हाताळला आणि वापरताना काही गोष्टींची विशेष काळजी घेतली तर फोन खराब झाल्यामुळे होणारे नुकसान टाळता येऊ शकते. तुम्हीही या चुका करत असाल तर लगेच या सवयी बदला, अन्यथा तुमचा स्मार्टफोन कायमचा खराब होऊ शकतो. पाहा या काही सोप्या टिप्स.

**चार्ज करताना लक्ष ठेवा**

स्मार्टफोन चार्ज करताना खूप काळजी घ्यावी लागते. अनेकदा युजर्स फोन चार्जवर ठेवतात आणि त्याबद्दल विसरून जातात. यामुळे स्मार्टफोनचा मदरबोर्डही खराब होऊ शकतो. फोनचा मदरबोर्ड खराब झाल्यास तुम्हाला खूप त्रास सहन करावा लागेल. यामुळे फोन कायमचा डेड होऊ शकतो. फोन एकदा खराब झाल्यास, त्यानंतर तुम्हाला नवीनच फोन घ्यावा लागेल. कारण फोनच्या मदर बोर्डची किंमत खूप जास्त आहे.

**पाण्यापासून दूर ठेवा**

पावसाळ्यात अनेकदा स्मार्टफोन खराब होतात. कारण, ते मदर बोर्डमध्ये हलका ओलावा आणतात. अशा परिस्थितीत फोनचा मदरबोर्ड कायमचा डेड होऊ शकतो. काही वेळा फोन पाण्याजवळ ठेवल्यास देखील मदर बोर्डमध्ये ओलावा येतो. मदर बोर्डमध्ये ओलावा असल्यास, फोन कायमचा डेड होऊ शकतो. फोनचा मदर बोर्ड खराब झाला असेल तर त्यानंतर फोनचा काहीही उपयोग होणार नाही.

**वारंवार चार्जिंग करणेसुद्धा नाही सुरक्षित**

स्मार्टफोनचे वारंवार चार्जिंग करणे देखील टाळावे. जर तुम्ही स्मार्टफोनला वारंवार चार्ज करत असाल तर फोनच्या प्रोसेसरवर त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो. काही प्रकरणांमध्ये यामुळे स्मार्टफोन कायमचा खराब होऊ शकतो. तसेच त्याचा सर्वात मोठा तोटा म्हणजे फोनची बॅटरी कायमची डेड होऊ शकते. अशा परिस्थितीत तुम्हाला फोनची बॅटरी आणि मदर बोर्ड दोन्ही बदलावे लागू शकतात. म्हणजेच चांगली मोठी रक्कम स्मार्टफोन रिपेयरसाठी खर्च करावी लागू शकते.

## वापरा नॅचरल टोनर

**चेहरा** ऑईली असेल तर घरगुती बनवलेल्या टोनरच्या सहाय्याने सुस्थितीत राखता येतो. तेलकट त्वचेसाठी काकडीपासून बनवलेले टोनर उपयुक्त ठरते. त्याचप्रमाणे टोमॅटोपासून बनवलेल्या टोनरच्या वापराने चेहऱ्याचा वर्ण उजळतो आणि मुरुमांची समस्या कमी होते. तुलसी टोनरही विशेष लाभकारक ठरते. यासाठी तुळशीची पाने चुरडून उकळत्या पाण्यामध्ये सोडावीत. थंड झाल्यावर या पाण्यामध्ये एक चमचा कोरफडीचा गर मिसळावा. आता तयार मिश्रण बाटलीत भरून टोनरसारखे वापरावे, याच पद्धतीने मेथी घालून अथवा हळदीच्या सहाय्याने टोनर बनता येते. हळदीचे टोनर बनवताना एक चमचा लिंबाचा रस मिसळण्यास विसरू नये.



## पोटावरील चरबी कमी करण्यासाठी या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक

एखाद्याच्या शारीरिक स्वास्थ्याचा अंदाज शरीराच्या सुदृढतेवरून लावला जातो. त्यामुळे बळकट आणि 'टोन्ड' स्नायू, उत्तम स्टॅमिना आणि अर्थातच न सुटलेले पोट यावरून एखाद्याच्या स्वास्थ्याचा अंदाज लावता येऊ शकतो. नियमित व्यायाम आणि संतुलित आहाराने शरीर सुदृढ आणि सुडौल होत असतानाच पोटावर असलेली चरबी कमी करणे हे सर्वात मोठे आव्हान ठरू शकते. पोटावर साठलेली चरबी कमी करण्यासाठी प्रयत्न करत असलेल्यांमध्ये याबद्दल अनेक गैरसमजही पाहावयास मिळतात. हे गैरसमज कोणते आणि यामध्ये कितपत तथ्य आहे, हे जाणून घेऊ या.



**व्यायामामध्ये** खास पोटावरील चरबी कमी करण्यासाठी केवळ 'क्रन्चेस' केल्याने चरबी कमी होते हा गैरसमज अनेकांच्या मनामध्ये असतो. क्रन्चेस हा व्यायाम प्रकार पोटावरील चरबी घटवण्यास सहाय्यक असला, तरी केवळ याच्यामुळे पोटाचा घेर कमी होतो असे मात्र नाही. क्रन्चेस करून पोटावरील चरबी कमी करतानाच, सर्व शरीरावरील चरबी कमी होईल अशा प्रकारचा व्यायाम केला जावा. त्यामुळे आपल्या व्यायामामध्ये 'स्ट्रेंग्थ ट्रेनिंग' आणि 'हाय इंटेन्सिटी कार्डियो'सारख्या व्यायाम प्रकारांचाही समावेश असावा.

कित्येकदा केवळ ग्रीन टीच्या सेवनाने पोटावरील चरबी घटण्यास मदत होत असल्याचा समजही अनेकांच्या मनामध्ये दिसून येतो. ग्रीन टीमध्ये ॲंटी ऑक्सिडंट्स मुबलक मात्रेमध्ये असल्याचे जरी खरे असले, तरी केवळ ग्रीन टी प्यायल्यानेच पोटावरील चरबी कमी होते असे समजणे चुकीचे आहे. पोटावरील चरबी कमी करण्यासाठी ग्रीन टीच्या जोडीनेच संतुलित, पौष्टिक आहार आणि योग्य व्यायामाचीही आवश्यकता असते. नियमित व्यायाम केल्याने आपल्या मनाला येईल ते आपण खाऊ-पिऊ शकतो अशी समजूत वजन आणि अर्थातच पोटावरील चरबी वाढण्यास कारणीभूत ठरत असते. योग्य आहार आणि नियमित व्यायाम हे एकमेकांना पूरक असून, यांच्यामधील योग्य संतुलन साधता आल्यानेच पोटावरील चरबी घटवता येणे शक्य होत असते.

बाजारामध्ये उपलब्ध असलेले तथाकथित 'लो फॅट', पॅकेज्ड अन्नपदार्थ वजन घटवण्यासाठी चांगला पर्याय असल्याचेही अनेक लोक मानतात. पण वास्तविक आहारामध्ये इतर सर्व पोषक तत्त्वांच्या सोबत स्निग्ध पदार्थदेखील आवश्यक असतात. त्यामुळे आहारातून शरीराला 'गुड फॅट्स' मिळतील असे अन्नपदार्थ आपल्या आहारामध्ये समाविष्ट असायला हवेत. शरीराला चांगले असे स्निग्ध पदार्थ आहारातून घेतले गेल्याने भूक लवकर शमण्यास मदत होत असते. त्यामुळे सातत्याने 'लो-फॅट' पदार्थांच्या सेवनाने शरीराला फायदा होण्याऐवजी नुकसान होण्याची शक्यताच जास्त असते. आपल्या आहारामध्ये तूप, चांगल्या प्रतीची खाद्यतेले यांचा समावेश अवश्य असावा. कमी खाल्ल्याने पोटावरील चरबी कमी होते असाही एक गैरसमज आढळून येत असतो. भोजन घेताना आपण किती खात आहोत याकडे लक्ष असणे अगत्याचे असले तरी आपली भूक मारणे किंवा नावापुरते काही तरी खाऊन अधिक काळ स्वतःला उपाशी ठेवणे याचे अपायच अधिक आहेत.

आपल्या शरीराला आवश्यक तितका आहार मिळाला नाही, तर शरीराची चयापचय शक्ती कमी होते आणि त्यामुळे वजन घटण्याची प्रक्रियाही मंदावते. त्यामुळे माफक आहाराद्वारे शरीराला आवश्यक इतकी कर्बोदके, प्रथिने, क्षार, जीवनसत्त्वे आणि अन्य पोषक तत्त्वे मिळतील याकडे लक्ष देणे गरजेचे असते. याकामी गरज भासल्यास आहारतज्ज्ञांचा सल्ला अवश्य घ्यावा.

## गुणकारी दुधीभोपळा

भोपळा ही अनेकांची नावडती भाजी, भरीत, कोशिंबीर, सूप असे पदार्थ भोपळ्यपासून बनवले जातात. कितीही नावडता असला तरी गुणधर्मामुळे थोड्या प्रमाणात का होईना, परंतु प्रत्येकाने भोपळा खायलाच हवा. चेहऱ्यावर पडणाऱ्या सुरकुत्यांपासून पोटाच्या गंभीर विकारांवर भोपळा गुणकारी ठरू शकतो. भोपळ्याच्या अशाच काही औषधी गुणधर्माबाबत जाणून घेऊ.

**भोपळ्यात 'बिटा करोटिन'**

- या घटकाचं प्रमाण बरंच जास्त असतं. यामुळे भोपळा हा 'अ' जीवनसत्त्वाचा समृद्ध स्त्रोत मानला गेलाय. बिटा केरोटिनमधील ॲंटिऑक्सिडंट्समुळे शरीरातील फ्री रेडिकल्सचा सामना अगदी सहज करता येतो.
- भोपळा हे तापावरचं औषध आहे.
- भोपळ्यातील विशिष्ट्य प्रकारच्या खनिजांमुळे मेंदूच्या नसांना आराम मिळतो.
- हृदयरोग्यांसाठी भोपळा वरदान मानला जातो. भोपळ्यात कोलेस्ट्रॉल कमी करण्याची क्षमता असते.
- आतड्यांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही भोपळा गुणकारी मानला जातो. भोपळ्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात राहते.
- बहुसंख्य महिलांमध्ये लोहाची कमतरता आढळते. अशा महिलांनी भोपळ्याच्या बियांचं सेवन करावं. भोपळ्याच्या बियांमध्ये लोह, झिंक, पोटॅशियम आणि मॅग्नेशियम यांचे प्रमाण भरपूर असल्याने बरेच लाभ होतात.
- पोटाच्या विविध विकारांवर भोपळा गुणकारी ठरू शकतो. यातील फायबरमुळे पचनक्रिया सुधारते आणि पोट स्वच्छ झाल्याने अनेक रोगांना दूर ठेवता येतं.



## नखे अशी सांभाळा

**आपल्या शरीरातील कोणताही अवयव मग तो छोटा असो वा मोठा जोपर्यंत स्वस्थ असतो आणि त्याच्या कार्यात कुठेही बाधा येत नसते तोपर्यंत शरीरात कोणत्याही व्याधी निर्माण होत नसतात. मात्र काही वेळा अगदी बारीकसारीक दुखणीही कमालीची वेदनादायक ठरतात. आपल्या बहुतेक सर्व कामामध्ये हाताची बोटे आपण वापरत असतो. अनेक वेळा या बोटांच्या नखांना इजा होतात आणि त्यात पाणी जाऊन पू होतो आणि मग बोटांना ठणका लागतो. त्यावेळी हे उपाय करून पाहावेत.**





**नख दुभंगणे, जिव्हाळे लागणे**

ज्या बोटाला हा विकार असेल त्या बोटाला घट्ट चिकटपट्टी बांधावी. हा विकार अगदी थोडक्या काळासाठी असतो व बरेच वेळा १-२ दिवसांतच बरा होतो.

**नखुरडे**

बऱ्याच वेळा नखुरडे झाल्याने बोटाला ठणका लागतो. यातही बोटाला चिकटपट्टी घट्ट बांधल्यास नखुरडे लवकर फुटते. दुसरा उपाय म्हणजे शेंदूर व अंड्याचा पांढरा बलक खलून लावल्याने आराम पडतो. शेंदूर हा ॲंटीसेप्टीक म्हणून काम करतो.

**नखे वेळच्या वेळी कापणे**

हाताच्या बोटांची तसेच पायाच्या बोटांची नखे वेळच्या वेळी कापणे, त्यात अडकलेली घाण वेळच्या वेळी काढणे हे एकंदर आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. वय वाढत जाईल तसा नखांचा कडकपणा वाढत जातो. वृद्ध वयात तर नखे कापणेही अवघड जाते. अशावेळी पाण्यात बोरीक पावडर टाकून पाय थोडा वेळ बुडवून ठेवावेत व मग नेलकटरच्या सहाय्याने नखे कापावीत. अंघोळ झाल्यानंतरही नखे गरम पाण्यामुळे मऊ पडलेली असतात. त्यावेळी ती काढावीत. तसेच नखे कापताना अगदी त्वचेजवळ कापू नयेत. त्यामुळे जिव्हाळे लागण्याचा संभव कमी होतो.

**लहान बाळाची नखे कापतानाही**

अगदी लहान बाळाची नखे कापतानाही बाळाची अंघोळ होऊन बाळ झोपले की मगच ती अलगद काढावीत.

## सौंदर्यप्रसाधनं ठेवा फ्रीजमध्ये

फ्रीजमध्ये नाशवंत पदार्थ ठेवले जातात. मात्र केवळ नाशवंत खाद्यपदार्थच फ्रीजमध्ये ठेवावेत असं नाही. लवकर खराब होणारी काही सौंदर्यप्रसाधनंदेखील फ्रीजमध्ये ठेवता येतील. फ्रीजमध्ये थंड वातावरणात प्रसाधनांमध्ये बॅक्टेरिया उत्पन्न होण्याचा धोका कमी होतो. त्याबरोबर प्रसाधनाचा रंग आणि आकार सुरक्षित राहतो. अशी कोणती प्रसाधनं फ्रीजमध्ये ठेवावीत, जाणून घेऊ



- परफ्यूम नेहमी थंड आणि कोरड्या जागी ठेवायला पाहिजे म्हणूनच परफ्यूम ठेवण्यासाठी फ्रीज ही योग्य जागा आहे. या थंड वातावरणामुळे परफ्यूमचं शेल्फ लाईफ वाढतं.
- डोळ्याखालील काळी वर्तुळं घालवण्यासाठी आय क्रीम्स वापरली जातात. कोल्ड आय क्रीममुळे डोळ्याखालची सूज कमी होते त्याचप्रमाणे काळवंडलेपणा कमी होतो. आय क्रीम्स फ्रीजमध्ये ठेवावीत.
- उन्हाळ्यात लिपस्टिक विरघळते. मूळ आकार नाहीसा होतो. अशी विरघळलेली लिपस्टिक लावणं कठीण जातं. शिवाय उष्ण तापमानामुळे लिपस्टिकमधील रसायनांमध्ये बदल घडू शकतो. मूळ रंग हरवण्याचाही धोका असतो. हे सर्व टाळण्यासाठी उन्हाळ्यात लिपस्टिक फ्रीमध्ये ठेवावी.
- फेशियल मास्क ठेवण्यासाठीही फ्रीज ही उत्तम जागा आहे. बाहेरच्या तापमानात फेशियल मास्कमधील काही महत्त्वपूर्ण घटक नष्ट होऊ शकतात.
- सध्या ऑर्गेनिक मेकअपचा बोलबाला आहे. अत्यंत चांगले परिणाम मिळत असल्यामुळे ही प्रसाधनं महिलांच्या पसंतीत उतरत आहेत. मात्र ऑर्गेनिक किंवा होममेड प्रसाधनांमध्ये प्रिझर्व्हेटिव्ह नसतात. म्हणून ती लवकर खराब होतात. हे टाळण्यासाठी ऑर्गेनिक प्रसाधनं फ्रीजमध्ये स्टोअर करावीत.
- व्हिटॅमिन सी युक्त सर्व प्रसाधनं सक्रिय घटकांनी युक्त असतात. त्याचप्रमाणे प्रसाधनांमध्ये रेटिनॉल आणि पेप्टाईड असल्यास अधिक काळजी घ्यावी लागेल. उग्र तापमानात या रसायनांच्या संरचनेत बदल होऊ शकतो. म्हणूनच अशी प्रसाधनं फ्रीजमध्ये ठेवावीत.

# वसई-विरारमध्ये निवडणूक चिन्हे अस्पष्ट

## निवडणूक विभागाच्या अनागोंदी कारभारावर टीका... ठाकरे गट, 'बविआ'कडून तीव्र संताप

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

वसई-विरार महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका पारदर्शक पद्धतीने पार पडाव्यात, यासाठी प्रशासन आणि निवडणूक विभाग कार्यरत असल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात मात्र निवडणूक चिन्हांबाबत सावळागोंधळ उघडकीस आला आहे. ईव्हीएमवरील काही पक्षांची निवडणूक चिन्हे अस्पष्ट, पुसट व फिकट दिसत असल्याने शिवसेना (ठाकरे गट) आणि बहुजन विकास आघाडीने यावर तीव्र आक्षेप नोंदविला आहे.

भारतीय जनता पक्षाचे 'कमळ' हे चिन्ह तुलनेने अधिक गडद (डार्क) आणि स्पष्ट दिसत असून, शिवसेना (ठाकरे गट) तसेच बहुजन विकास आघाडीच्या चिन्हांची स्पष्टता कमी असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय बहुजन विकास आघाडीचे चिन्ह निवडणूक आयोगाच्या अधिकृत प्रसिद्धी यादीप्रमाणे नसून, मशीनवर वेगळ्या



स्वरूपात आणि उलटे दाखवण्यात आल्याचा गंभीर मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे.

वसई-विरार महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसंदर्भात ईव्हीएम मशीनची पडताळणी सुरू असताना उमेदवार आणि प्रतिनिधींच्या उपस्थितीत ही बाब निदर्शनास आल्याचे सांगण्यात आले. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सर्व राजकीय पक्षांची निवडणूक चिन्हे समान गडदपणा, समान स्पष्टता आणि कोणताही भेदभाव न होता दिसणे आवश्यक असते. मात्र प्रत्यक्षात तसे आढळून न आल्याने मतदानाच्या दिवशी मतदारांमध्ये गोंधळ निर्माण होण्याची शक्यता असल्याचे मत शिवसेना (ठाकरे गट)चे शशिभूषण शर्मा यांनी व्यक्त केले. बहुजन विकास आघाडीचे संदेश जाधव यांनी सांगितले की, वसई येथील सेंट ऑगस्टीन मतदान केंद्रातील निवडणूक अधिकाऱ्यांसमोर या त्रुटींची स्पष्ट नोंद घेण्याची मागणी करण्यात आली आहे. निवडणूक चिन्हे अस्पष्ट व पुसट असल्याबाबत विविध पक्षांनी लेखी निवेदनही दिले. मात्र त्यावर ठोस निर्णय न देता ईव्हीएम सील करण्यात आल्याचे उपस्थित कार्यकर्त्यांनी सांगितले.

दरम्यान, या प्रकाराकडे गांभीर्याने पाहून तातडीने योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली असल्याची माहिती ठाकरे शिवसेनेचे पदाधिकारी राजाराम बाबर यांनी दिली. जर याचा परिणाम मतदान प्रक्रियेवर किंवा निवडणूक निकालावर झाला, तर आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

### निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर आक्षेप घेणारी याचिका फेटाळली; उच्च न्यायालयाचा निर्णय

निवडणूक आयोगाची गलथान आणि मनमानी कार्यपद्धत तसेच उमेदवारांवर विविध विभागांतून एनओसी आणण्याची सक्ती करण्याच्या निर्णयाविरोधातील याचिका शुक्रवारी मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या खंडपीठाने, निवडणूक प्रक्रिया आधीच पार पडली आहे. निवडणुकीच्या तोंडावर यात हस्तक्षेप करणे योग्य नाही. हस्तक्षेप केल्यास सगळीच प्रक्रिया बारगळून निवडणुकीच्या वेळापत्रकावर त्याचा थेट परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या टप्प्यावर या याचिकेवर सुनावणी घेणे योग्य ठरणार नाही, असे स्पष्ट करत याचिकाकर्त्यांना दिलासा देण्यास नकार देत याचिका फेटाळून लावली. मुंबई महापालिका आगामी निवडणुकीसाठी २२७ प्रभागांमधील निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी उमेदवारी अजासीबत पाणी, कर, पोलीस अशा विविध विभागांची ना हरकत प्रमाणपत्रे नसल्याने उमेदवारी अर्ज अतितांत्रिक कारणांमुळे फेटाळून लावले. केवळ तांत्रिक आणि नियमबाह्य कारणास्तव उमेदवारी अर्ज फेटाळण्याचा निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आक्षेप घेत अपक्ष उमेदवार मोझम अली मीर यांनी ॲड. मोईनुद्दीन चौधरी यांच्या मार्फत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

# पादचाऱ्यांना वाचवण्याच्या प्रयत्नात बसवरील नियंत्रण सुटले

## आरोपी बस चालकाचा न्यायालयात दावा



■**मुंबई। प्रतिनिधी,**

भांडुप येथे बस अपघातात चार जणांचा मृत्यू आणि नऊ जण जखमी झाल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या बेस्ट बस चालक संतोष सावंत यांनी जामिनासाठी सत्र न्यायालयात अर्ज केला आहे. पादचारी आणि ऑटो रिक्षाला वाचवण्याच्या प्रयत्नात बसवरील नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात घडल्याचा दावा त्यांनी केला आहे. संतोष सावंत यांचे वकील देवेंद्र पाटील यांनी बुधवारी सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज करताना सांगितले की, अपघात ज्या ठिकाणी झाला तो रस्ता अरुंद होता, तेथे मोठी गर्दी होती आणि फेरीवाल्यांनी अतिक्रमण केलेले होते. वळण घेत असताना अचानक समोर एक ऑटो रिक्षा आणि एक पादचारी आल्याचे त्यांनी पाहिले. त्यांना वाचवण्याचा प्रयत्न करत असताना बसवरील नियंत्रण सुटले आणि अपघात झाला, असा युक्तिवाद करण्यात आला.

### जामिन अर्जावर पुढील आठवड्यात सुनावणी

अपघाताच्या वेळी आपण कोणत्याही नशेत नव्हतो आणि ही घटना केवळ अपघातच होती, असा दावाही सावंत यांनी केला आहे. या जामिन अर्जावर पुढील आठवड्यात सुनावणी होणार असून, न्यायालयाने सरकारी पक्षाला आपले उत्तर देण्यास सांगितले आहे. भांडुप पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या प्रकरणानुसार, २९ डिसेंबर रोजी सावंत हे बेस्टची ओलेक्ट्रा ग्रीनटेक कंपनीची नऊ मीटर लांबीची इलेक्ट्रिक बस (मार्ग क्रमांक ६०६) चालवत होते. ही बस भांडुप (पश्चिम) उपनगरीय रेल्वे स्थानकाजवळ पादचाऱ्यांवर आदळली, ज्यात चार जणांचा मृत्यू झाला आणि १० जण जखमी झाले, असा आरोप आहे.



# वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मेट्रो-१ स्थानकांवर सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशीनची सुविधा

■**मुंबई। प्रतिनिधी,**

वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या मेट्रो-१ मार्गिकेतील सर्व १२ मेट्रो स्थानकांवर सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशीन बसवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मेट्रो प्रशासनाने घेतला आहे. मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेडने (एमएमओपीएल) खासगी कंपन्यांच्या सहकार्याच्या माध्यमातून मेट्रो स्थानकांवर ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

महिलांना प्रवासादरम्यान अनेकदा आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जावे लागते. विशेषतः मासिक पाळीच्या काळात योग्य वेळी स्वच्छता उत्पादने उपलब्ध नसल्यामुळे अडचणी निर्माण होतात. ही बाब लक्षात घेऊन मुंबई मेट्रो-१ ने महिलांसाठी हा विशेष उपक्रम राबवला आहे. या उपक्रमाअंतर्गत सिरोना या नामांकित कंपनीसोबत भागीदारी करण्यात आली असून, बहुउत्पादन मासिक पाळी स्वच्छता व्हेंडिंग मशीन स्थानकांवर बसवण्यात आल्या आहेत.

**१० रुपयांत दोन सॅनिटरी पॅड :**

परवडणाऱ्या दरात मासिक पाळीदरम्यान स्वच्छतेसाठी सॅनिटरी पॅडसह अन्य काही वस्तू उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तेथे ४० रुपये किंमतीचे दोन सॅनिटरी पॅड १० रुपयात उपलब्ध करून देतानाच १० सॅनिटरी पॅडचे पाकीट ७० रुपयांत उपलब्ध करून देण्यात आले आहे. १० सॅनिटरी पॅडची किंमत १५० रुपये अशी असताना महिला प्रवाशांना हे पाकिट केवळ ७० रुपयांत दिले जात आहे.

# महाविद्यालयांना नियमबाह्य प्रवेश भोवणार

## विद्यार्थ्यांच्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळल्यास होणार लाखोंचा दंड

■**मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई विद्यापीठाशी सलग्न महाविद्यालये, संस्था तसेच स्वायत्त महाविद्यालयांमध्ये होणाऱ्या नियमबाह्य प्रवेशावर प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रथम वर्ष पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी नियमित पद्धतीने प्रवेश अर्ज न भरलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळल्यास संबंधित महाविद्यालयांवर कारवाई करण्याचा इशारा विद्यापीठाने दिला आहे. त्यानुसार लाखो रुपयांचा दंड तसेच प्रवेश क्षमतेत कपात करण्याचा ठराव विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मंजूर करण्यात आला आहे.

काही महाविद्यालये नियमबाह्य पद्धतीने विद्यार्थ्यांना प्रवेश देतात. हे प्रकार रोखण्यासाठी विद्यापीठाने कठोर भूमिका घेतली आहे. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मंजूर ठरावानुसार विद्यार्थ्यांच्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळल्यास संबंधित महाविद्यालयांवर दंडात्मक कारवाई, प्रवेश क्षमतेत



### तिसऱ्यांदा नियमभंग झाल्यास प्रवेश रद्द होणार

महाविद्यालयांची अशा प्रकारची चूक दुसऱ्यांदा आढळल्यास शैक्षणिक वर्ष २०२७-२८ मध्ये संबंधित महाविद्यालयाची प्रवेश क्षमता थेट ५० टक्क्यांनी कमी करण्यात येईल. तिसऱ्यांदा नियमभंग आढळल्यास त्या वर्षासाठी प्रवेश क्षमता पूर्णपणे रद्द करण्याचा निर्णय घेतला जाणार असल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले. या निर्णयामुळे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रियेत शिस्त आणि पारदर्शकता वाढेल तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांना यापुढे सवलत दिली जाणार नसल्याचा ठाम संदेश विद्यापीठाने दिला आहे.

कपात आणि गरज भासल्यास चौकशी समिती नियुक्त करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

**त्रुटी आढळल्यास दोन लाखांचा दंड**

१ ते ५ विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणांत त्रुटी आढळल्यास संबंधित महाविद्यालयावर २ लाख रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे. शुल्काच्या दुप्पट रकमेची अतिरिक्त दंडात्मक आकारणी, तर विद्यार्थ्यार्ला स्वतंत्रपणे ५ हजारांचा दंड भरावा लागेल.

**नियमभंग केल्यास पाच लाखांचा दंड**

महाविद्यालयांनी ६ ते २० विद्यार्थ्यांच्या प्रवेशांमध्ये नियमभंग केल्यास ५ लाख दंड आणि प्रति विद्यार्थ्याच्या शिक्षण शुल्काच्या दुप्पट रकमेची दंडात्मक आकारणी करण्यात येणार आहे.

**गंभीर त्रुटी १० लाख**

२१ ते ४० विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणांतील गंभीर त्रुटींच्या बाबतीत महाविद्यालयाला १० लाखांचा दंड, प्रत्येक विद्यार्थ्याच्या शुल्काच्या दुप्पट रकमेची दंडात्मक आकारणी करण्यात येईल. याशिवाय शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून प्रवेश क्षमतेत २५ टक्के कपात करण्यात येईल तसेच विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे ५ हजार रुपयांचा दंड भरावा लागेल.

**शुल्काच्या तिप्पट दंड**

४१ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांच्या प्रवेशांत नियमभंग आढळल्यास हे प्रकरण अत्यंत गंभीर मानले जाणार आहे. अशा वेळी महाविद्यालयावर १० लाख रुपयांचा दंड तसेच प्रति विद्यार्थ्याच्या शिक्षण शुल्काच्या तिप्पट रकमेची दंडात्मक आकारणी करण्यात येईल. यासोबत २०२६-२७ पासून प्रवेश क्षमतेत २५ टक्के कपात करून समितीमार्फत सखोल तपासणी केली जाणार आहे. प्रत्येक विद्यार्थ्यार्ला ५ हजारांचा दंड भरावा लागणार आहे.

# पुरेशा शौचकुपाअभावी मुंबईकरांची गैरसोय

## २५ महिलांसाठी एक शौचकूप, मात्र वापर ८०० महिलांकडून

■**मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईची लोकसंख्या दीड कोटींच्या घरात पोहोचली असून वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत मुंबई महापालिकेकडून उपलब्ध करून देणाऱ्या सोयीसुविधा तोकड्या पडू लागल्या आहेत. मुंबईत ३५ पुरुषांसाठी एक व २५ महिलांसाठी एक शौचकूप असणे गरजेचे आहे. मात्र ८०० ते ९०० महिला एका शौचकुपाचा वापर करतात तर १५०० पुरुष एका शौचकूपचा वापर करत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

मुंबई महापालिकेने शौचालय बांधणीवर जोर दिला, मात्र नवीन शौचालय बांधल्यानंतर देखभाल दुरुस्तीकडे मुंबई महापालिका दुर्लक्ष करत असल्याने शौचालयांची काही महिन्यांत दुरवस्था होते, अशी खंत 'राइट टू पी'च्या वरिष्ठ पदाधिकारी रोहिणी कदम यांनी व्यक्त केली आहे.

मुंबई शहर आणि उपनगरातील शौचालय समस्या अतितीव्र आहे. २०११ च्या जनगणनेनुसार मुंबईतली ५२ टक्के जनता चाळीत, झोपड्यांमध्ये वास्तव्य करते. दहापैकी चार मुंबईकर या वस्त्यांमध्ये राहतात. एक चौरस किलोमीटर परिसरात लोकसंख्येची घनता ४५ ते ९२ हजार आहे. २०११ च्या जनगणनेनुसार मुंबईत अंदाजे ६० लाख लोक झोपडपट्टीत राहतात. जागतिक बँक आणि २०१४ पासून सुरू झालेल्या भारत



### या गोष्टींची पूर्तता होणे गरजेचे!

- प्रस्तावित सामूहिक शौचालयाच्या बांधकामाचं संकल्पचित्र सीबीओ आणि वस्तीला बांधकामापूर्वी दाखवण्यात यावं. याबद्दल सीबीओला कागदोपत्री असणाऱ्या अधिकाराची प्रत्यक्षही अंमलबजावणी करण्यात यावी.
- सामुदायिक शौचालयातील विजेची मीटर हे टेरिफ २ चे बदलून टेरिफ १ करण्यात यावे व तशी सूचना वीजपुरवठा करणाऱ्या कंपन्यांना पालिका प्रशासनाने करावी.
- शौचालयातील पाणीपुरवठा करताना झोपडपट्टी धारकांना लागू असलेल्या शुल्काप्रमाणे शुल्क आकारण्यात यावे
- शौचालयांच्या बांधकामाची गुणवत्ता सुधारणे आणि दुरुस्ती याच्या पुनर्रचनेसाठी विस्तारित धोरण असावे.

सरकारच्या स्वच्छ भारत मिशन (शहर) मार्गदर्शक तत्त्वानुसार ३५ पुरुषांकरिता एक आणि २५ महिलांकरता एक शौचकूप असले पाहिजे. म्हणजेच ६० लाख लोकांकरिता अंदाजे २ लाखांहून अधिक शौचकूप असली पाहिजेत, असे ही त्या म्हणाल्या.

मुंबईत वस्ती स्वच्छता कार्यक्रमानुसार लॉट क्रमांक ११ मध्ये २२ हजार शौचकुपे बांधली जाणार होती. नंतर त्यात बदल करून १९८४४ शौचकुपे बांधण्याचे निश्चित करण्यात आले. त्यापैकी १८३९९ शौचकुपे बांधण्यात आली. १५४५ शौचकुपांची कामे विविध कारणांमुळे पूर्ण झालेली नाही. काम देण्यात आलेल्या ८३४ शौचालयांच्या तुलनेत आतापर्यंत ७७३ शौचालयांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. इतर शौचालयांचे काम अद्याप सुरू झालेले नाही. कोरो राइट टू पी अंतर्गत करण्यात आलेल्या सर्व्हेमध्ये लॉट ११ मध्ये बांधण्यात एम ईस्ट विभागात १८८ शौचालये आढळून आली. त्यात ३५८७ सीट उपलब्ध करण्यात आल्या आहेत. त्यामधील २०८ सीट्स अपंगांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. या शौचालयांचा सर्व्हे करताना त्यात लिकेज, सेफ्टीक टँक, सिव्हरेज लाइन, लाइट बिल, पाणी बिल आदी मुद्दे समोर आले. यातील काही बाबींची पूर्तता करण्यात आली आहे. काहींची पूर्तता केलेली जात आहे. आता पालिका लॉट १२ मधील शौचालय बांधण्याचे काम हाती घेणार आहे. लॉट ११ मध्येच इतक्या समस्या असताना लॉट १२ मधील समस्या आधीच दूर केल्या तर शौचालय मजबूत टिकाऊ व चालवणे शक्य होणार आहे, असे ही त्या म्हणाल्या.

# ऑनलाइन गेमसाठी मित्राच्या खात्यातून ३०,००० रुपये घेतले अन् हारल्यानंतर पैशांची मागणी केली असता निर्घृण हत्या...

■**मुंबई। प्रतिनिधी,**

कुर्ला परिसरातून पाच महिन्यांपूर्वी बेपत्ता झालेल्या २० वर्षीय तरुणाची हत्या करण्यात आल्याची बातमी समोर आली आहे. तसेच, हत्येनंतर पीडित तरुणाला मीठी नदीत फेकून देण्यात आल्याचं वृत्त आहे. विनोबा भावे नगर पोलिसांनी या प्रकरणातील आरोपी तरुण अंकित साहू याला अटक करून त्याची चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबूल केल्याची माहिती आहे.

मृत तरुणाचं नाव राहुल कुमार योगेंद्र प्रसाद (२०) असून तो कुर्ला पश्चिमेकडील क्रांती नगर, बैल बाजार परिसरात आपल्या कुटुंबासह राहत होता. तसेच, पीडित तरुण हा एका प्रायव्हेट कंपनीत नोकरी करत होता. आरोपी अंकित साहू सुद्धा त्याच परिसरातील रहिवासी असून ते एकमेकांना ओळखत होते. पोलिसांच्या माहितीनुसार, २४ जुलै २०२५ रोजी राहुल घरातून बाहेर पडला होता आणि त्यानंतर तो घरी परतलाच नाही. कुटुंबियांनी



सुद्धा त्याचा खूप शोध घेण्याचा प्रयत्न केला, मात्र काहीच माहिती हाती न लागल्याने विनोबा भावे नगर पोलीस स्टेशनमध्ये तो बेपत्ता असल्याची तक्रार नोंदवण्यात आली.

त्यानंतर, पीएसआय शिवाजी तायडे यांच्या नेतृत्वाखाली एक विशेष टीम तयार करण्यात आली. या पथकाने टेक्निकल तपास सुरू करून राहुलच्या मोबाईल फोनचं लोकेशन आणि कॉल डिटेल रेकॉर्ड तपासले. तपासादरम्यान, राहुल सतत आरोपी अंकित साहू याच्या संपर्कात असल्याचं उघडकीस आलं. टेक्निकल तपास केला असता २४ जुलै रोजी दोघे एकाच ठिकाणी उपस्थित असल्याची माहिती मिळाली. या पुराव्यांच्या आधारे, पोलिसांनी अंकितला ताब्यात घेतलं आणि त्याची चौकशी सुरू केली.

चौकशीदरम्यान, अंकितने राहुलची हत्या केल्याचं कबूल केलं. तसेच, हत्येनंतर राहुलला मीठी नदीत फेकून देण्यात आल्याचं राहुलने सांगितलं. यानंतर, अंकित घटनास्थळावरून फरार झाला. पोलिसांच्या माहितीनुसार, राहुलला मोबाईल बँकिंगची पुरेशी माहिती नसल्याने त्याने आपल्या प्रोव्हिडंट फंड अकाउंटमधून ऑनलाइन पैसे काढण्यासाठी अंकितची मदत घेतली होती. दरम्यान, अंकितला राहुलच्या अकाउंटची माहिती मिळाली. तसेच, तपासादरम्यान अंकितला मोबाईल ॲपवर ऑनलाइन गेमिंग आणि जुगाराचं व्यसन होतं. त्याने राहुलच्या अकाउंटमधून सुमारे 30 हजार रुपये घेतले आणि ते पैसे त्याने ऑनलाइन गेमिंगमध्ये गमावले. राहुलला अंकितच्या या कृत्याबद्दल कळालं असता त्याने त्याच्याकडील पैसे परत मागितले आणि अंकितच्या आईला याबद्दल सांगण्याची धमकी दिली. मिळालेल्या माहितीनुसार, याच भितीमुळे अंकितने राहुलचा काटा काढण्याची योजना आखली. 24 जुलै रोजी अंकितने राहुलला मीठी नदीजवळ बोलवलं. त्यावेळी, अंकितने पीडित राहुलला मागून धक्का दिला आणि त्याचा मोबाईल फोन घेऊन तो घटनास्थळावरून फरार झाला. विनोबा भावे नगर पोलिसांनी याप्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल केला असून आरोपीला ताब्यात घेतलं. तसेच, राहुलच्या मृतदेहाच्या शोधासाठी मीठी नदीत सर्च ऑपरेशन जारी आहे.

# कांदिवलीमध्ये ट्रेडिंगच्या बहाण्याने व्यावसायिकाची लाखोंची फसवणूक

### डेमो शेअर्सद्वारे फसवणूक

यानंतर जतीन कुमारच्या सांगण्यावरून प्रेमकुमार यांनी डिमॅट खाते उघडून त्याचे लॉगिन तपशील आरोपीकडे दिले. खासगी वित्तसंस्थेकडून २.८० कोटी रुपयांचे कर्ज मंजूर झाल्याचे स्क्रीनशॉट आरोपीने दाखवले. मात्र, प्रत्यक्षात त्यांच्या खात्यात कोणतीही रक्कम जमा झाली नाही. पोलिस तपासात धक्कादायक बाब समोर आली असून, कोणतेही शेअर्स गहाण ठेवण्यात आले नव्हते. डिमॅट खात्यात दाखवलेले शेअर्स हे केवळ प्रॅक्टिस ट्रेडिंगसाठी वापरले जाणारे डेमो किंवा आभासी शेअर्स असल्याचे निष्पन्न झाले. या संदर्भात जाब विचारला असता आरोपी भावंडांकडून उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. आरोपीने दिलेला सुरक्षा धनादेशही वटवला नाही. फक्त १.७७ लाख रुपये परत करण्यात आले असून उर्वरित ६९.१८ लाख रुपयांचा अपहार झाल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.

■**मुंबई। प्रतिनिधी,**

नव्या व्यवसायासाठी मोठ्या रकमेचे कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवत आर्थिक फसवणुकीचे प्रकार सध्या वाढत आहेत. असे असतानाच, मुंबईतील कांदिवली परिसरात कोट्यवधी रुपयांचे कर्ज मिळवून देण्याचा दावा करत फसवणूक झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. एका फ्रीलान्स व्यावसायिकाची तब्बल ६९ लाखांहून अधिक रुपयांची फसवणूक करण्यात आल्याने या प्रकरणी कांदिवली पोलिसांनी एका आरोपीला अटक केली असून त्याची बहीण सध्या फरार आहे, अशी माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव जतीन कुमार उनाडकट असे असून न्यायालयाने त्याला पोलिस कोठडी सुनावली आहे. या फसवणूक प्रकरणातील सहआरोपी असलेली त्याची बहीण संगीता उनाडकट हिचा शोध सुरू असून, या दोघांनी यापूर्वीही अशाच प्रकारच्या फसवणुका केल्या आहेत का, याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे.

या प्रकरणातील तक्रारदार प्रेमकुमार वर्मा हे विरार येथे राहणारे फ्रीलान्स व्यावसायिक आहेत. २०१७ ते २०२३ या कालावधीत त्यांनी एका डायरेक्ट सेल्स एजन्सीत काम करत अनेकांना बहुराष्ट्रीय बँकांकडून वैयक्तिक कर्ज मिळवून देण्यास मदत केली होती. दोन




वर्षांपूर्वी त्यांनी संगीता उनाडकटला २५ लाख रुपयांचे कर्ज मिळवून दिले होते. याच काळात संगीताने प्रेमकुमार यांची ओळख तिचा भाऊ जतीन कुमार याच्याशी करून दिली. जतीन हा शेअर ट्रेडिंग आणि बल्क डीलिंगमध्ये कार्यरत असल्याचा दावा त्याने केला होता.

माहितीनुसार, जानेवारी २०२४ मध्ये नोकरी सोडल्यानंतर नव्या व्यवसायाच्या संधींचा शोध घेत असताना, जतीन आणि संगीता यांनी प्रेमकुमार यांना कांदिवलीतील सरोवर हॉटेल परिसरात भेटण्यास बोलावले. त्या भेटीत त्यांनी ह्यबूम लिफ्टह्न म्हणजेच उंच ठिकाणी काम करण्यासाठी आवश्यक असलेली अवजड यंत्रे भाड्याने द्यायची किंवा विकायची हा व्यवसाय सुरू करण्याची योजना मांडली. या व्यवसायासाठी ३.५ कोटी रुपयांची गुंतवणूक आवश्यक असल्याचे सांगत, सुरुवातीला ९० लाख रुपये उभे करण्याची गरज असल्याचे नमूद केले.

जतीन कुमार याने स्वतःच्या नावावरील शेअर्स प्रेमकुमार यांच्या नावावर ट्रान्सफर करून, त्या शेअर्सच्या आधारे मोठ्या रकमेचे कर्ज मिळवून देण्याचे आश्वासन दिले. या आश्वासनांवर विश्वास ठेवून प्रेमकुमार यांनी विरारमधील आपला फ्लॅट ८६ लाख रुपयांना विकला. जुलै ते ऑगस्ट २०२४ दरम्यान, शेअर्स ट्रान्सफर व कर्ज प्रक्रियेसाठी त्यांनी हप्त्यांमध्ये ८१ लाख रुपये जतीन कुमार याला दिले. यासंदर्भात दोघांमध्ये लेखी करारही करण्यात आला होता.

**पोलिसांची कारवाई**

या प्रकरणी प्रेमकुमार वर्मा यांच्या तक्रारीवरून कांदिवली पोलिसांनी फसवणूक व विश्वासघाताचा गुन्हा दाखल करत ७ जानेवारी रोजी जतीन कुमार उनाडकटला अटक केली आहे. फरार सहआरोपी संगीता उनाडकटचा शोध सुरू असून, या फसवणुकीत आणखी नागरिक बळी पडले आहेत का, याचाही सखोल तपास पोलिसांकडून केला जात आहे. लाख रुपयांची रक्कम अपहार करण्यात आल्याचे निष्पन्न झाले.

प्रेमकुमार वर्मा यांच्या तक्रारीवरून कांदिवली पोलिसांनी फसवणूक आणि विश्वासघाताचा गुन्हा दाखल करत ७ जानेवारी रोजी जतीन कुमार उनाडकटला अटक केली आहे. फरार सहआरोपीचा शोध सुरू असून, या प्रकरणात आणखी कोणी बळी आहे का, याचाही तपास पोलीस करत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मंदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com